दैनिक अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७३ । शुक्रवार, दि.१७ जुलै २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## शेअर बाजारात गुंतवणूक : ५९ लाखांची फसवणूक

**अहिल्यानगर :** शेअर बाजारामध्ये पैसे गुंतवल्यास मोठ्या प्रमाणावर नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका तरुणासह इतरांची तब्बल ५८ लाख ८० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगरमध्ये समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बालाजी अंबादास यनगंदुल (रा. नालेगाव, अहिल्यानगर, मूळ रा. करमाळा, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी मन अजयकुमार कांकरीया व अभिनंदन अजयकुमार कांकरीया (दोघे रा. चिचोंडी पाटील, ता. जि. अहिल्यानगर) यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. हा संपूर्ण प्रकार ९ ऑगस्ट २०२५ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत अहिल्यानगरमधील कायनेटीक चौक परिसरात घडला. आरोपींनी फिर्यादी बालाजी व त्यांच्या ओळखीच्या लोकांचा विश्वास संपादन केला. शेअर बाजारात पैसे गुंतवल्यास भरघोस परतावा देतो, असे सांगून आरोपींनी त्यांच्याकडून वेळोवेळी ऑनलाईन आणि रोख स्वरूपात एकूण ५८ लाख ८० हजार रुपये उकळले. फिर्यादी यांनी आपल्या रकमेची आणि नफ्याची मागणी केली असता आरोपींनी त्यांना टाळाटाळ करुन पैसे परत करण्यास स्पष्ट नकार दिला. पो.नि. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### महत्वाचे...

## पंढरपूर वारीत चापडगावच्या वारकऱ्याचा मृत्यू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील चापडगाव येथील दलित तरुण भारत मुरलीधर चित्ते (वय ४५) हे आषाढी एकादशी निमित्त गायकवाड जळगाव येथून दीपक महाराज भोसले यांच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये पंढरपूरकडे जात असताना अचानकपणे आलेल्या ऱ्हदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. अशी माहिती मयत भारत त्यांच्या वडिलांनी दिली आहे.शेवगाव तालुक्यातील गायकवाड जळगाव येथून दीपक महाराज भोसले यांच्या पालखीचा सोहळा आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे जातो. या वर्षी मयत भारत हा देखील या सोहळ्यात सहभागी झाला होता. मयत भारत यांना त्यांच्या वडिलांनी चापडगाव येथून दुचाकीवर नेऊन पालखी सोहळ्यात पोहच केले होते.सोहळ्याचा पहिला मुक्काम पाथर्डी तालुक्यातील मिडसावंगी येथे झाला. दुसऱ्या मुक्कामी पालखी मार्गस्थ होत असताना भारत हा तरुण देखील सहभागी झाला होता. शनिवारी एकादशी असल्याने उपवास धरून सोहळ्यासोबत असणाऱ्या टेम्पोमध्ये जाऊन बसत असतानाच त्याला ऱ्हदविकारचा तीव्र झटका आला.

(उर्वरीत पान ४ वर)

# पाणीटंचाईचे सावट

## धरणांत अवघा ४४.५६% पाणीसाठा; मराठवाड्याची सर्वाधिक चिंता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** गेल्या आठवड्यात दमदार हजेरी लावल्यानंतर राज्यात पावसाने पुन्हा विश्रांती घेतली असून, महाराष्ट्रावर पाणीटंचाईचे सावट गडद होत आहे. जलसंपदा विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये सध्या केवळ ४४.५६ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ६०.५३ टक्के होता. मराठवाड्यात सर्वात कमी २५.३९ टक्के पाणीसाठा असून, खरीप पिकांसह पिण्याच्या पाण्याची चिंता वाढली आहे.

जायकवाडी धरणात अवघा ३१.४१ टक्के पाणीसाठा असून, माजलगाव (१६.७३%), मांजरा (१६.६४%), निम्न दुधना (२३.९५%) आणि सीना-कोळेगाव धरण जवळपास रिकामे झाले आहेत. नाशिक विभागात ४१.७२%, नागपूरमध्ये ३९.७६% तर अमरावती विभागात ४२.२६% पाणीसाठा आहे. कोकण विभागात तुलनेने सर्वाधिक ६२.०६ टक्के जलसाठा आहे.

मराठवाड्यातील सर्वात मोठे जायकवाडी धरण केवळ ३१.४१% भरले असून, गेल्या वर्षी याच कालावधीत ते ७६.३८% भरले होते. तर अहिल्यानगर जिल्ह्यातील भंडारदरा धरणात समाधानकारक साठा असला तरी निळवंडे धरणातील साठा अद्याप तुलनेने कमी आहे.

दरम्यान, पुणे विभागात एकूण जलसाठा ५२.७१ टक्के असला तरी गेल्या वर्षाच्या तुलनेत तो लक्षणीय कमी आहे. हवामान विभागाने लवकरच समाधानकारक पावसाचा अंदाज व्यक्त केला नाही तर राज्यातील अनेक गावांना पुन्हा टँकरवर अवलंबून राहावे लागू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

**प्रमुख धरणांतील पाणीसाठा (टक्केवारी)**

भंडारदरा : ५०.७६%
निळवंडे : २५.३८%
मुळा : ६५% पेक्षा अधिक
जायकवाडी : ३१.४१%
खडकवासला : ८८.७५%
पानशेत :६१.६०%
पवना : ६७.२१%
भाटघर : ५२.६२%
उजनी : ५३.४८%
कोयना : ४९.१६%

# पेट्रोल पंप डीलरशिपचे फेसबुक आमिष...

## व्यावसायिकाची ८४.५३ लाखांची फसवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जिओ कंपनीचा पेट्रोल पंप आणि डीलरशिप मिळवून देण्याचे आमिष दाखवत जामखेड येथील एका व्यावसायिकाची तब्बल ८४ लाख ५३ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अहिल्यानगर सायबर पोलिस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उदय गुलाबराव शिंदे यांचे जामखेड येथे कृषी सेवा केंद्र आहे. फेसबुकवर त्यांना जिओ कंपनीच्या पेट्रोल पंपाची डीलरशिप देण्याची जाहिरात दिसली. जाहिरातीतील लिंकवर संपर्क साधल्यानंतर सौरभ अग्रवाल व शिंदे इंजिनिअर अशी नावे सांगणाऱ्या दोन व्यक्तींनी त्यांच्याशी संपर्क साधला.

या दोघांनी पेट्रोल पंपाची डीलरशिप मिळवून देण्याचे आश्वासन देत प्रोसेसिंग फी, कागदपत्रांची पडताळणी, मंजुरी प्रक्रिया आदी विविध कारणे सांगून ३१ ऑक्टोबर २०२५ ते ८ जुलै २०२६ या कालावधीत वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास भाग पाडले. या काळात उदय शिंदे यांनी एकूण ८४ लाख ५३ हजार रुपये भरले.यानंतर आणखी दोघांनी

(उर्वरीत पान ४ वर)




**सायबर पोलिसांचे आवाहन**

**समाजमाध्यमांवर पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, सरकारी योजना किंवा मोठ्या व्यवसायाच्या डीलरशिपच्या नावाखाली फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे कोणत्याही सोशल मीडिया जाहिरातीवर आंधळा विश्वास ठेवू नये, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये आणि खातरजमा केल्याशिवाय कोणाच्याही बँक खात्यात पैसे जमा करू नयेत, असे आवाहन सायबर पोलिसांनी नागरिकांना केले आहे.**

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीला उच्च न्यायालयात आव्हान

## आठवडाभरात उत्तर सादर करण्याचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी संचालक मंडळ निवडणुकीला छत्रपती संभाजीनगर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठात आव्हान देण्यात आल्याने जिल्ह्याच्या सहकार व राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्या एकलपीठासमोर १५ जुलै रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने सर्व प्रतिवादींना नोटीस बजावत एका आठवड्यानंतर पुढील सुनावणी निश्चित केली आहे. या घडामोडीमुळे जिल्हा बँकेच्या निवडणूक प्रक्रियेवर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथील शेतकरी व सहकारी संस्थेचे सभासद सतीश मांजबापू नाईक यांनी ही रिट याचिका दाखल केली असून, त्यांच्यावतीने ॲड. अजित काळे यांनी न्यायालयात बाजू मांडली. याचिकेत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने १५ जून २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाला आव्हान देण्यात आले आहे.याचिकेनुसार, संबंधित परिपत्रकात थकबाकीदार संस्थांनी आपल्या संचालकांऐवजी बिगर थकबाकीदार सदस्याचा प्रतिनिधी म्हणून ठराव करण्याची अट घालण्यात आली आहे. मात्र, महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील कलम ७३सीए(१)(ळ) हे केवळ संबंधित व्यक्तीला अपात्र ठरवते, संपूर्ण संस्थेला नव्हे. त्यामुळे परिपत्रकाद्वारे कायद्यात नसलेली नवी अपात्रता निर्माण करण्यात आली असून ती कायद्याच्या विरोधात असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.याचिकेत निवडणूक प्राधिकरणाच्या अधिकारावरही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. कायद्याचा अर्थ लावणे किंवा नवीन अपात्रता निर्माण करण्याचा अधिकार निवडणूक प्राधिकरणाला नसून तो केवळ राज्य शासन अथवा न्यायालयालाच असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. सहकार कायद्यातील कलम ७३सीबी हे केवळ निवडणूक प्रक्रिया राबविण्यापुरते मर्यादित असून, नव्या अटी किंवा अपात्रता घालण्याचा अधिकार त्यातून मिळत नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला आहे.




सुनावणीदरम्यान ॲड. व्ही. एच. दिघे यांनी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या वतीने नोटीस स्वीकारली. न्यायालयाने सर्व प्रतिवादींना नोटीस बजावत एका आठवड्यानंतर पुढील सुनावणी निश्चित केली आहे. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक ही जिल्ह्याच्या राजकारणातील अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाते.

(उर्वरीत पान ४ वर)

**कर्जमाफी योजनेतील लाभार्थी निवडणुकीस पात्र ठरतील?**

**याचिकेत राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६'चाही उल्लेख करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत अनेक थकबाकीदार शेतकरी व सहकारी संस्था कर्जमुक्त होऊन निवडणुकीस पात्र ठरू शकतात. अशा परिस्थितीत योजना पूर्णपणे अंमलात येण्यापूर्वीच निवडणूक घेऊन मोठ्या संख्येने संस्थांना प्रतिनिधित्वापासून वंचित ठेवणे हे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.**

### वीज बिल माफी अदानीच्या फायद्यासाठी

# शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचा डाव : सपकाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** शेतकऱ्यांच्या वीजबिल माफीची राज्य सरकारची घोषणा, शेतकऱ्यांच्या हितासाठी नसून उद्योगपती गौतम अदानी यांच्या फायद्यासाठी असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. शासनाच्या विद्युत मंडळाच्या (एमएसईबी) चारही विभागांचे खाजगीकरण करून ते अदानी समूहाकडे सोपविण्याचा सरकारचा प्रयत्न असून, वीजबिल माफीची घोषणा त्याच दिशेने टाकलेले पाऊल असल्याचा दावा सपकाळ त्यांनी केला.

टिळक भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत सपकाळ म्हणाले की, शेतकरी कर्जमाफीची घोषणा करूनही प्रत्यक्षात अद्याप कर्जमाफी झालेली नाही. त्याचप्रमाणे वीजबिल माफीची घोषणाही दिशाभूल करणारी असून तिचा उद्देश शेतकऱ्यांना दिलासा देणे नसून भविष्यातील खासगीकरणाचा मार्ग मोकळा करणे हा आहे.

राज्यातील शासकीय शाळा योजनाबद्ध पद्धतीने बंद पाडल्या जात असून शिक्षण क्षेत्राचे खाजगीकरण करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचाही त्यांनी आरोप केला. अनेक सरकारी शाळांमध्ये वीज, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि शिक्षकांची कमतरता असल्याने त्या बंद पडण्याच्या स्थितीत आहेत.

(उर्वरीत पान ४ वर)

# एम.डी. ड्रग्स तस्कराला अटक २.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

### श्रीरामपुरात सलग दुसऱ्या दिवशी 'एलसीबी'चा दणका!



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यात पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेला मोठे यश आले आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि श्रीरामपूर शहर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत, नांदूर शिवार (अस्तगाव फाटा) येथून सोहेल जुबेर शेख (वय २७) याला एम.डी. (मेफेड्रोन) ड्रग्जसह रंगेहात अटक केली आहे.

या कारवाईत पोलिसांनी २ लाख ५२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, ड्रग्ज माफियांचे धाबे दणाणले आहेत.यात अंमली पदार्थ विरोधी

(उर्वरीत पान ४ वर)

# शाळकरी मुलीचा पाठलाग करून विनयभंग!

## आरोपी अटकेत, तुळापूर येथे संतापाची लाट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** राहुरी तालुक्यातील निंभेरे-तुळापूर परिसरात शाळेत जाणाऱ्या एका अल्पवयीन शाळकरी मुलीचा पाठलाग करून तिचा हात धरून विनयभंग केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, संतप्त ग्रामस्थांनी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करत काही काळ तणाव निर्माण केला होता. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार -पिडीत १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी इयत्ता १० वीत शिकत असून ती नेहमीप्रमाणे सायकलवरून शाळेत जाते. १४ जुलै २०२६ रोजी दुपारी शाळा सुटल्यानंतर ती मैत्रिणीसह घरी जात असताना, आरोपीने मोटारसायकलवरून तिचा पाठलाग केला. त्यानंतर १५ जुलै रोजी सायंकाळी पुन्हा आरोपीने तिचा पाठलाग केला. यावेळी त्याने मुलीचा हात धरून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तसेच, आपल्या मोबाईल नंबरची चिठ्ठी जबरदस्तीने मुलीच्या हातात देऊन, जर चिठ्ठी घेतली नाहीस तर तुला मारीन, अशी धमकी दिली.






(छायाचित्र - सोमनाथ डोळे)

मुलगी घरी परतल्यानंतर तिने घडलेला सर्व प्रकार कुटुंबीयांना सांगितला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने

(उर्वरीत पान ४ वर)

# अहिल्यानगरमध्ये ४६ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई

## अनियमितता, युरिया 'लिंकिंग' प्रकारांवर कृषी विभागाचा दणका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार कृषी निविष्ठांचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यात मोठी कारवाई करत तब्बल ४६ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित व रद्द केले आहेत. तपासणीत खत विक्रीतील अनियमितता, युरिया 'लिंकिंग', ई-पॉसवरील साठा व प्रत्यक्ष साठ्यातील तफावत, तसेच नियमबाह्य व्यवहार आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्या आदेशानुसार जून व जुलै महिन्यात तालुकास्तरीय गुणनियंत्रण निरीक्षक आणि भरारी पथकांकडून व्यापक तपासणी मोहीम राबविण्यात आली. जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दोषी आढळणाऱ्या केंद्रांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले होते.तपासणीत अकोले (२), शेवगाव (८), संगमनेर (३), नेवासा (१), कर्जत (३), कोपरगाव (३) आणि नगर (४) येथील २४ कृषी सेवा केंद्रांचे रासायनिक खते, बियाणे व कीटकनाशक विक्री परवाने निलंबित करण्यात आले. तसेच अहिल्यानगर तालुक्यातील कायमस्वरूपी बंद असलेल्या २१ आणि श्रीरामपूरमधील १ कृषी सेवा केंद्राचा खत विक्री परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आला.

शेतकऱ्यांनी कृषी निविष्ठांबाबत कोणतीही अडचण किंवा गुणवत्तेबाबत तक्रार असल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन बोराळे यांनी केले आहे.



**तक्रार कुठे कराल?**

**टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-४०००**

**व्हॉट्सअॅप : ९८२२४४६६५५**

**तालुका कृषी अधिकारी कार्यालयातही तक्रार नोंदवता येणार. खतांचा जादा दर, युरिया लिंकिंग, निकृष्ट बियाणे किंवा साठ्यातील अनियमितता आढळल्यास तातडीने माहिती देण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.**

# बंगालच्या उपसागरात रोहिंग्याच्या दोन नौका उलटल्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**ढाका :** म्यानमारमधील संघर्ष आणि अस्थिरतेमुळे पलायन करणाऱ्या रोहिंग्या निर्वासितांवर मोठे संकट कोसळले आहे. बंगालच्या उपसागरात दोन नौका उलटल्याने ५०० हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या घटनेबाबत संयुक्त राष्ट्र निर्वासित उच्चायुक्त कार्यालय (यूएनएचसीआर) आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटना (आयओएम) यांनी तीव्र चिंता व्यक्त केली असून, मृतांचा अधिकृत आकडा अद्याप निश्चित झालेला नसल्याचे स्पष्ट केले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही नौका जूनच्या अखेरीस म्यानमारच्या राखाइन राज्यातून निघाल्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने रोहिंग्या निर्वासित होते. काही प्रवासी बांगलादेशातील कॉक्स बाजार येथील निर्वासित छावण्यांमधून या प्रवासाला निघाले होते. पहिल्या नौकेत सुमारे २५० प्रवासी होते. प्रवास सुरू झाल्यानंतर काही वेळातच या नौकेचा संपर्क तुटला. दुसरी नौका सुमारे २८० प्रवाशांना घेऊन ८ जुलै रोजी म्यानमारच्या इरावदी किनाऱ्याजवळ बुडाल्याचा संशय आहे. संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही घटनांमध्ये एकूण ५३० हून अधिक प्रवासी बेपत्ता असून त्यांचा मृत्यू झाला असण्याची भीती आहे. मात्र, शोध आणि बचावकार्य सुरू असल्याने अंतिम आकडेवारी अद्याप समोर आलेली नाही. अनेक मृतदेह सापडले असून उर्वरित प्रवाशांचा शोध सुरू आहे.

(उर्वरीत पान ४ वर)

# राजकारण्यांच्या भागीदारीत बिल्डर असुरक्षित ?

खलील शेख आत्महत्येने बांधकाम व्यवसायातील विदारक वास्तव पुन्हा उघडे केले. पुण्यातील बांधकाम व्यावसायिक खलील शेख यांच्या आत्महत्येने केवळ एका कुटुंबाचा आधार हिरावला नाही, तर महाराष्ट्रातील बांधकाम व्यवसायावर वर्षानुवर्षे जमा होत असलेल्या संकटांच्या ढिगाऱ्यावरही प्रकाश टाकला आहे. आत्महत्येपूर्वी तयार केलेल्या व्हिडिओमध्ये त्यांनी आर्थिक व्यवहार, थकीत देयके, भागीदारांकडून कथित दुर्लक्ष आणि काही व्यक्तींनी दिलेल्या धमक्यांचा उल्लेख केला आहे. या आरोपांची सत्यता पोलीस तपासातूनच स्पष्ट होईल. मात्र, एक प्रश्न आज ठामपणे विचारण्याची वेळ आली आहेराजकीय नेते भागीदार असतानाही एखादा बिल्डर इतका असुरक्षित कसा होतो?

बांधकाम क्षेत्र हे आज महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते. हजारो कोटी रुपयांची उलाढाल, लाखो कामगारांना रोजगार आणि शेकडो पूरक उद्योग या क्षेत्रावर अवलंबून आहेत. पण या क्षेत्रात आज गुंतवणूकदारापेक्षा अधिक जोखमीवर बिल्डरच उभा आहे. जमीन खरेदीपासून ते इमारत पूर्ण होईपर्यंत त्याला प्रशासन, राजकारण, न्यायालय, बँका, भागीदार, स्थानिक दबावगट आणि ग्राहक अशा अनेक पातळ्यांवर संघर्ष करावा लागतो.

खलील शेख यांच्या प्रकरणात वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील वादामुळे प्रकल्प रखडल्याचे सांगितले जात आहे. प्रश्न असा आहे की, प्रकल्प सुरू होण्यापूर्वी संबंधित जमिनीची कायदेशीर स्थिती स्पष्ट का करण्यात आली नाही? कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक झाल्यानंतर जर अचानक शासकीय किंवा न्यायालयीन स्थगिती येत असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? अशा चुका केवळ विकासकाचे आर्थिक कंबरडे मोडत नाहीत, तर शेकडो ग्राहक, कामगार आणि पुरवठादारांनाही अडचणीत आणतात.

याहून गंभीर बाब म्हणजे राजकारण्यांची भागीदारी. आज अनेक बांधकाम प्रकल्पांमध्ये विविध पक्षांचे नेते किंवा त्यांचे नातेवाईक थेट अथवा अप्रत्यक्ष भागीदार असल्याचे दिसते. अनेकदा त्यांच्या नावामुळे प्रकल्पाला बळ मिळते, पण वाद निर्माण झाल्यास त्याच राजकीय वजनाचा दबावही जाणवू लागतो. त्यामुळे सामान्य बिल्डर, कंत्राटदार किंवा उपकंत्राटदार स्वतः ला असहाय्य समजू लागतो. ही भावना लोकशाहीसाठी धोकादायक आहे.

खलील शेख यांच्या व्हिडिओमध्ये काही व्यक्तींवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. त्या आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. आरोप खरे असतील तर दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे; आणि आरोप निराधार असतील तर तेही तितक्याच स्पष्टपणे समोर आले पाहिजे. कारण अशा प्रकरणांमध्ये अफवा आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप सत्य झाकून टाकतात.

बांधकाम व्यवसायातील आणखी एक मोठा प्रश्न म्हणजे थकीत देयके. लाखो रुपयांची बिले महिनोनमहिने अडकून राहतात. बँकांचे हप्ते मात्र वेळेवर भरावे लागतात. व्याज वाढत जाते. शेवटी कर्जाचा डोंगर उभा राहतो. एका बिल्डरचे पैसे अडकल्यास त्याच्यावर अवलंबून असलेले अनेक कंत्राटदार, पुरवठादार आणि कामगारही आर्थिक संकटात सापडतात. त्यामुळे या क्षेत्रात




वेळेत देयके देण्याची सक्ती आणि आर्थिक शिस्त निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

सरकारनेही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्रात प्रकल्पांना मंजुरी मिळण्यासाठी अनेक विभागांचे ना-हरकत दाखले, पर्यावरणीय परवानग्या, महसूल नोंदी, नगररचना मंजुरी अशा अनेक टप्प्यांतून जावे लागते. एवढी यंत्रणा अस्तित्वात असताना नंतरच जमिनीवर वाद निर्माण होणे म्हणजे प्रशासनातील समन्वयाचा गंभीर अभाव आहे. त्याची किंमत शेवटी उद्योगपती, गुंतवणूकदार आणि सामान्य नागरिक मोजतात.

आज बांधकाम क्षेत्रात कायद्यापेक्षा दबाव अधिक प्रभावी ठरत आहे, अशी भावना निर्माण होत असेल तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. राजकीय पाठबळ, आर्थिक ताकद किंवा स्थानिक प्रभाव यांच्या जोरावर व्यवहार चालत असतील, तर प्रामाणिक उद्योजक या क्षेत्रापासून दूर जातील. त्याचा फटका राज्याच्या विकासालाच बसेल.

खलील शेख यांच्या आत्महत्येचा तपास केवळ 'आत्महत्या' म्हणून मर्यादित ठेवून चालणार नाही. त्यांच्या व्हिडिओतील प्रत्येक आरोप, प्रत्येक आर्थिक व्यवहार, प्रत्येक भागीदारी करार आणि कथित धमकीची सखोल चौकशी झाली पाहिजे. पोलिसांनी कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता सत्य जनतेसमोर आणणे हीच या प्रकरणातील खरी कसोटी असेल.

एका बिल्डरच्या मृत्यूमागे जर आर्थिक व्यवस्था, राजकीय हस्तक्षेप, शासकीय गोंधळ आणि मानसिक छळ यांचे दुष्टचक्र असेल, तर ही केवळ एका व्यक्तीची शोकांतिका नाही; ती राज्याच्या विकास व्यवस्थेच्या अपयशाची कबुली आहे. खलील शेख यांच्या मृत्यूने उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधली नाहीत, तर उद्या आणखी एखादा विकासक, कंत्राटदार किंवा उद्योजक अशाच टोकाच्या निर्णयाकडे ढकलला जाईल. आणि तेव्हा केवळ शोक व्यक्त करून समाजाची जबाबदारी संपणार नाही.

# आनंदवाडी पुलाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करा : आ. खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** पुणे–नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील आनंदवाडी (चंदनापुरी) येथे सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामाची आमदार अमोल खताळ यांनी पाहणी करून कामाचा दर्जा, सुरक्षितता आणि प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना पुलाचे काम दर्जेदार, सुरक्षित व निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याच्या सक्त सूचना त्यांनी दिल्या.

पाहणीदरम्यान पुलाच्या बांधकामासह वाहतुकीसाठी करण्यात आलेल्या पर्यायी व्यवस्थेची माहिती अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. पुणे–नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे सिमेंट काँक्रीटीकरण झाल्यानंतर आनंदवाडी येथील नागरिकांना सर्विस रस्त्याअभावी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. याबाबत ग्रामस्थांनी आमदार खताळ यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला होता. त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व संबंधित ठेकेदारांना सर्विस रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सर्विस रस्त्याचे काम आता सुरू झाले आहे.

यावेळी आ. खताळ यांनी केवळ सर्विस रस्ता नव्हे, तर आनंदवाडी गाव, स्मशानभूमी आणि शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी स्वतंत्र असे तीन जोडरस्तेही उभारण्याच्या स्पष्ट सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. या सुविधा पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिकांची वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या पाहणीवेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी दिलीप शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे, ग्रामपंचायत सदस्य अंकुश राहणे, श्याम राहणे, माजी सरपंच रोहिदास राहणे, ज्ञानदेव राहणे, विलास सरोदे, बाळ किसन सरोदे, बाळासाहेब सरोदे, बाबाजी सरोदे, बाळासाहेब काळे, भाऊसाहेब बोहाडे, नितीन सरोदे यांच्यासह आनंदवाडी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भानसहिवरा येथे 'हुमणी अळी व्यवस्थापन' चर्चासत्र कार्यक्रमाला प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** मुळा एज्युकेशन सोसायटीच्या सोनई येथील कृषी महाविद्यालयाच्या वतीने 'ग्रामीण (कृषी) जागरूकता आणि कृषिसंबंधी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम २०२६-२७' अंतर्गत नेवासा तालुक्यातील भानसहिवरा येथे शेतकऱ्यांसाठी 'हुमणी अळी व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन आणि चर्चासत्र कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला

भानसहिवरा येथील ढवाण वस्ती येथे आयोजित चर्चा सत्रात पिकांचे मोठे नुकसान करणाऱ्या हुमणी अळीचा प्रादुर्भाव कसा ओळखावा आणि त्यावर कोणत्या जैविक व रासायनिक पद्धतीने नियंत्रण मिळवावे याचे थेट बांधावर जाऊन प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यासाठी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे डॉ. संतोष चौगुले यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम व हुमणी अळी व प्रा. नरेंद्र दहातोंडे यांनी हुमणी अळीच्या जीवनचक्राची माहिती देऊन तिच्या प्रतिबंधात्मक उपाय,




तर प्रा. जयसिंग वाघमारे यांनी जमिनीची सुपीकता सुधारण्यासाठी उपाययोजना व सूक्ष्म अन्नद्रव्य आणि डॉ. राजेंद्र लीपणे यांनी पिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि हुमणी अळीमुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे, प्रा. अनुप दरंदले आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले. चर्चासत्रात येथील शेतकरी राजेंद्र ढवाण, सुरेश ढवाण, किशोर ढवाण, विश्वनाथ चव्हाण, किशोर कदम, मधुकर भणगे, भाऊसाहेब काळे यांच्यासह ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे 'कृषिदूत' प्रणव जावळे, ओम कवडे, पीयूष माने, ओंकार भांड आणि वैष्णव कोल्हे यांनी विशेष प्रयत्न केले.किशोर भणगे यांनी आभार मानले

# कोपरगावात चार दिवसाआड होणार पाणीपुरवठा : नगराध्यक्ष संधान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** शहरातील नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय घेत नगरपरिषदेने सहा दिवसांऐवजी आता पुन्हा चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली आहे. पावसाअभावी धरणातील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात घटल्याने काही



कालावधीपूर्वी कोपरगाव साठवण तलावातील उपलब्ध पाणी जपून वापरण्यासाठी पाणीपुरवठ्याचे दिवस वाढविण्यात आले होते. मात्र सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेऊन नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांच्या हिताचा विचार करत पूर्ववत चार दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय जाहीर केला आहे अशी माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली आहे. यावेळी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, पाणीपुरवठा सभापती वैशाली वाजे उपस्थित होते. धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन नगरपरिषदेने खबरदारीचा उपाय म्हणून पाणीपुरवठ्याचे अंतर वाढवले होते. नागरिकांनीही या काळात प्रशासनाला सहकार्य करत उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर केला. त्यामुळे शहरातील पाणी व्यवस्थापन सुरळीत ठेवण्यास मोठी मदत झाली. आता परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाल्याने नागरिकांना दिलासा देण्यासाठी चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे शहरातील हजारो नागरिकांची गैरसोय कमी होणार असून नियमित पाणीपुरवठ्याचा लाभ मिळणार आहे.

# पुनर्निरीक्षण मोहीम : १०० टक्के पूर्ण जिल्हाधिकाऱ्यांकडून बीएलओंचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** भारत निवडणूक आयोगाच्या दि. १४ मे २०२५ रोजीच्या पत्रान्वये मतदार याद्याचा विशेष सखोल पुनरीक्षणाचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत २९ जून २०२६ पासून गणनापत्रक वाटप व डिजीटायझेशनचे काम सुरू झालेले आहे. २२३ राहुरी विधानसभा मतदार संघातील १०० टक्के डिजीटायजेशन झालेले आहे अशा पहिल्या दोन बीएलओंना जिल्हाधिकारी डॉ पकंज आशिया यांच्या हस्ते सत्कार करून गौरविण्यात आले. यात लाजरास अण्णा कासोटे, संतोष राधाकिसन आल्हाट, यांचा समावेश आहे.तर कामचुकार कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई काही बीएलओचे डिजीटायजेशनचे




संघात एकूण ०३ लाख २९ हजार ८९३ एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदार संख्या सर्व मतदारांना गणना पत्रक देऊन त्यांच्या माहितीचे डिजीटायझेशन दिलेल्या मुदतीत करणे बंधनकारक आहे.२२३ राहुरी विधानसभा मतदार संघात विशेष कॅम्प घेण्यात आले. मंगळवारी २२३ राहुरी विधानसभा मतदार संघात एकूण १ लाख १५ हजार ९४१ मतदारांचे डिजीटायजेशन करण्यात आले, ही टक्केवारी ३५.१५ टक्के इतकी आहे. २२३ प्रमाण खूप कमी आहे. अशा बीएलओच्या कामात प्रगती दिसून न आल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल असा इशारा जिल्हाधिकारी यांनी दिला आहे. एसआयअर संबधीत काही अडचणी आल्यास नागरिकांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदारांनी आपला सर्व तपशील अचूक भरून बीएलओ यांचेकडे तत्काळ दयावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ पकंज आशिया यांनी केले आहे.

# मांस विक्रेत्यांकडून गोदावरीत टाकल्या जाणाऱ्या घाणीवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** शहरातील मांस विक्री करणाऱ्या काही दुकानदारांकडून विक्रीनंतर उरणारी घाण व कचरा गटारी तसेच गोदावरी नदीपात्रात टाकला जात असल्याचा आरोप करत, संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी गोदमाई प्रतिष्ठान ट्रस्टने कोपरगाव नगरपरिषदेकडे निवेदनाद्वरे केली आहे. ट्रस्टचे अध्यक्ष आदीनाथ ढाकणे यांनी कोपरगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना गुरुवार दि १६ जुलै रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील विविध ठिकाणी मांस विक्रीनंतर उरणारा कचरा गटारीत किंवा थेट गोदावरी नदीपात्रात टाकला जात आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असून गोदावरी नदीचे प्रदूषणही वाढत आहे. यापूर्वीही गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्टने या विषयावर पाठपुरावा केला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच मांस विक्रेत्यांना योग्य पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या सूचना देऊन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दुकाने अधिनियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ट्रस्टने केली आहे. या निवेदनाची दखल घेऊन नगरपरिषदेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्टने व्यक्त केली आहे.

# आश्वी व शिबलापूर महसूल मंडळासाठी 'महाराजस्व अभियान समाधान शिबीर'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

आश्वी : आश्वी आणि शिबलापूर महसूल मंडळातील नागरिकांच्या महसूल विषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. हे भव्य शिबीर शुक्रवार, दिनांक १७ जुलै २०२६ रोजी आश्वी बुद्रुक येथील साई लॉन्स व मंगल कार्यालय येथे सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत पार पडणार आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना विविध दाखल्यांसाठी किंवा रेशनकार्डच्या कामांसाठी वारंवार सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. ही अडचण ओळखून, महसूल विभागाने सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या शिबिरामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा निपटारा केला जाणार आहे रेशनकार्ड संबंधित कामे: नवीन रेशनकार्ड, नावात बदल किंवा दुरुस्ती, महसूल अभिलेख: ७/१२ आणि ८-अ उतारे मिळवणे, दाखले: विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दाखले, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला आणि जातीचे दाखले.

# निमजमध्ये एसटी स्मार्ट कार्डासाठी जादा शुल्क; ग्रामस्थांचा संताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एनसीएमसी) स्मार्ट कार्डासाठी शासनाने निश्चित केलेल्या १९९ रुपयांऐवजी संगमनेर तालुक्यातील निमज ग्रामपंचायत कार्यालयात २५० रुपये आकारले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून संबंधित एजन्सीची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.



ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, ग्रामपंचायतीने नियुक्त केलेल्या खासगी एजन्सीकडून प्रत्येक स्मार्ट कार्डासाठी २५० रुपये घेतले जात आहेत. जादा शुल्काबाबत विचारणा केली असता, कार्ड पोस्टाने पाठविण्यासाठी अतिरिक्त ५० रुपये घेत असल्याचे एजन्सी चालकाने सांगितले. मात्र, शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम कोणत्या नियमाअंतर्गत आकारली जाते, याबाबत समाधानकारक उत्तर देण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच जादा शुल्काबाबत प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांशी अरेरावीची भाषा वापरल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी ग्रामस्थांनी आमदार अमोल खताळ, संगमनेर आगार व्यवस्थापक, गटविकास अधिकारी तसेच निमज ग्रामपंचायतीकडे निवेदन देऊन चौकशीची मागणी केली आहे. शासनाने निश्चित केलेल्या शुल्कानुसारच स्मार्ट कार्ड उपलब्ध करून द्यावेत आणि संबंधित एजन्सीवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# श्रीरामपूर, बाभळेश्वर राहुरी विभागात ५३ हजार ग्राहकांना स्मार्ट मीटर

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर -** महावितरण कंपनीच्या श्रीरामपूर विभागासह बाभळेश्वर राहुरी या उपविभागीय कार्यालया अंतर्गत एकूण १ लाख २७ हजार ग्राहकांपैकी ५३ हजार ग्राहकांना हे अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. महावितरण कंपनीच्या या मोहिमेला मोठी गती मिळाली असल्याची माहिती कार्यकारी अभियंता राजेंद्र राजपूत यांनी दिली.

श्रीरामपूर, राहुरी, बाभळेश्वर तसेच राहुरी फॅक्टरी आणि बेलापूर या पाच उपविभागीय कार्यालया अंतर्गत हे स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. घरगुती व्यापारी आणि औद्योगिक अशा वर्गवारीत मोडत असलेल्या ग्राहकांना हे स्मार्ट मीटर देण्यात आले आहे.

> सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वापरण्यात येणाऱ्या विजेवर प्रत्येक युनिट मागे प्रत्येक ग्राहकास थेट ८० पैशाची सवलत मिळत आहे. बिलिंग प्रक्रिया आता अधिक पारदर्शक झाली आहे. स्मार्ट मीटर हे स्वयंचलित आहे. रीडिंग साठी त्यात कोणताही मानवी हस्तक्षेप होत नाही. रीडिंग घेता क्षणी ते ऑनलाइन पद्धतीने थेट मुंबई मुख्य कार्यालयाला प्राप्त होते. टाइम ऑफ डे बिलिंग मुळे ग्राहकांना वीज वापराचे नियोजन करणे शक्य झाले आहे. स्मार्ट मीटर हे ग्राहकांसाठी अधिक विश्वासार्ह अचूक आणि आधुनिक सुविधा ठरत आहे.
>
> **राजेंद्र राजपूत**
> **कार्यकारी अभियंता,**
> **महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी श्रीरामपूर.**

वीज वितरण व्यवस्थेत डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याच्या दृष्टी कोणातून हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे. यामुळे ग्राहकांचा अनुभव अधिक सुलभ आणि विश्वासार्ह होणार आहे. विशेष म्हणजे सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत वापरण्यात आलेल्या विजेवर प्रति युनिट मागे ८० पैसे सूट मिळणार असल्याचे ग्राहकांना वीज वापराचे नियोजन अधिक फायदेशीर पद्धतीने करता येणार आहे.

मार्ट मीटर मुळे दर तासाला किती वीज वापरली गेली याची माहिती मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध आहे. महावितरणच्या स्मार्ट मीटर उपक्रमामुळे वीज वितरण व्यवस्था अधिक आधुनिक विश्वासार्ह आणि ग्राहक केंद्र बनली असून राज्यातील ऊर्जा क्षेत्राच्या डिजिटल परिवर्तनाला त्यामुळे गती मिळाली आहे. स्मार्ट मीटरमुळे केवळ बिलिंग प्रक्रिया नव्हे तर संपूर्ण सेवा व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे.

स्मार्ट मीटर हे मोबाईल ॲपशी जोडलेले असल्याने कोणत्या तासात किती वीज वापरली याची अचूक नोंद ग्राहकाला दिसते. यामुळे घरातील कोणते उपकरण कधी आणि किती जास्त वीज वापरतोय हे समजणे अधिक सोपे झाले आहे. या माहितीच्या आधारे ग्राहक आपल्या वीज वापराचे योग्य नियोजन करून विनाकारण वीज वापर टाळता येणार आहे.

# एनसीएमसी स्मार्ट कार्डद्वारे एसटीच्या शासकीय सवलतींचा लाभ घ्या : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** सर्वसामान्य नागरिकांचा एसटी बसमधील प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि डिजिटल करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) योजनेचा लाभ पात्र नागरिकांनी १ ऑगस्टपूर्वी घ्यावा, असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

सुरेगाव (कोळपेवाडी) बसस्थानक येथे आमदार काळे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महायुती शासनाच्या निर्णयानुसार एसटी महामंडळाच्या विविध प्रवास सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्डच्या माध्यमातून महिलांना प्रवासभाड्यात ५० टक्के सवलत, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तर ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील नागरिकांना ५० टक्के सवलत मिळणार आहे. तसेच विद्यार्थी, दिव्यांग आणि इतर पात्र लाभार्थींनाही शासनाच्या नियमानुसार सवलतींचा लाभ मिळणार आहे.

स्मार्ट कार्डसाठी आधार कार्ड, वयाचा पुरावा, दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास), विद्यार्थ्यांसाठी सरल क्रमांक आणि चालू मोबाईल क्रमांक आवश्यक असल्याचे आमदार काळे यांनी सांगितले. हे कार्ड रिचार्ज करून कॅशलेस पद्धतीने तिकीट काढता येत असल्याने प्रवास अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि आधुनिक होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती वाल्मिकराव कोळपे, अंबादास धनगर, सुनिल कोळपे, महेश कोळपे, मोतीराम निकम, ओंकार बिडगर, प्रकाश नवघरे, राजेंद्र कोळेकर, स्थानक प्रमुख प्रकाश हिरे यांच्यासह ग्रामस्थ व लाभार्थी उपस्थित होते.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## सोनगाव-सात्रळ येथे प्रवरा कृषी महाविद्यालयाचा शेतकरी चर्चासत्र उपक्रम




**झरेकाठी** : प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषी महाविद्यालयाच्या वतीने राहुरी तालुक्यातील सोनगाव-सात्रळ येथे दुभत्या जनावरांचे रोग व चारा व्यवस्थापन तसेच डाळिंब आणि ऊस पिकातील रोग व किड नियंत्रण या विषयांवर शेतकरी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला दोन्ही गावांचे सरपंच, माजी संचालक, ग्रामपंचायत सदस्य आणि परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. प्रा. सुदाम वर्पे यांनी ऊस पिकावरील हुमणी अळीच्या सामुदायिक नियंत्रणाचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. गोरक्षनाथ अंत्रे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमी खर्चात अधिक दूध उत्पादनासाठी वैज्ञानिक पशुपालनाचा सल्ला दिला. प्रा. श्रीकृष्ण हुरुळे यांनी डाळिंब पिकातील तेल्या रोग नियंत्रणासाठी जैविक खतांचा संतुलित वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य अमोल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिकन्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रास्ताविक डॉ. रमेश जाधव यांनी, सूत्रसंचालन समीक्षा शिंदे हिने तर आभार प्रदर्शन श्रद्धा सावंत हिने केले.

## खंडाळा विद्यालयाच्या अनन्या ढोकचौळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**श्रीरामपूर** : रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल खंडाळा विद्यालयाची विद्यार्थिनी अनन्या गणेश ढोकचौळे हिने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये नेत्रदीपक यश मिळवत शाळेचे नाव उंचावले आहे. अनन्याने इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तम गुण मिळवून शिष्यवृत्तीधारक होण्याचा मान पटकावला. याशिवाय तिला एन.एम.एम.एस. परीक्षेतही शिष्यवृत्ती प्राप्त झाली असून, इस्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी तिची निवड झाली आहे. या विद्यालयातील इयत्ता पाचवीचे ३ व आठवीचे ४ विद्यार्थीही शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वांनी अभिनंदन केले आहे.

## पाणंद रस्ते समितीवर दीपक पटारे



**श्रीरामपूर** : मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने प्रत्येक विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीत सह-अध्यक्ष नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने हा निर्णय घेण्यात आला. यानुसार श्रीरामपूर विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सह-अध्यक्षपदी भाजपचे माजी तालुका अध्यक्ष दीपक पटारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांना गती मिळून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दर्जेदार रस्त्यांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## कोल्हार येथे कासार समाजाकडून वारकऱ्यांना अन्नदान

**कोल्हार** : आषाढी एकादशीनिमित्त धुळे जिल्ह्यातील लामकानी येथून हरिभक्त परायण संजय महाराज भंडारी, सौ. संगीता भंडारी व मृदंगाचार्य अंकुश महाराज जोशी यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडीचे कोल्हार येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी कोल्हार येथील कासार समाजाच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले. मुंजोबा चौकातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. मंदिर परिसरात हरिपाठ, हरिनामाचा गजर आणि भक्तिमय वातावरणात धार्मिक कार्यक्रम पार पडले. रात्री हरिभक्त परायण संजय महाराज भंडारी यांचे कीर्तन झाले. तसेच कोल्हार भगवतीपूर येथील कासार समाजाच्या वतीने संजय महाराज भंडारी यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दुसऱ्या दिवशी दिंडीच्या प्रस्थानावेळी शाम कोळपकर यांच्या वतीने वारकऱ्यांना चहा व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. अन्नदान व स्वागत सोहळा यशस्वी करण्यासाठी कैलास कोळपकर, अनिल कोळपकर, चंद्रकांत कोळपकर, योगेश कोळपकर, ज्ञानेश्वर गंभीर, प्रमोद कुंभकर्ण, साईप्रसाद कुंभकर्ण, गणेश कुंभकर्ण यांच्यासह कासार समाजातील कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दूध आंदोलनातील शेतकरी संघटनेवरील खटले अखेर मागे

**शिरसगाव** : दूध दरवाढीसाठी २०२२-२३ मध्ये श्रीरामपूर येथील हरेगाव फाटा येथे शेतकरी संघटनेने केलेल्या रास्ता रोको आंदोलनाप्रकरणी दाखल करण्यात आलेले खटले अखेर शासनाने मागे घेतले आहेत. याबाबत श्रीरामपूर न्यायालयाने १५ जुलै २०२६ रोजी आदेश देत आंदोलनातील आरोपींना दिलासा दिला. दूध उत्पादकांना कमी दरामुळे मोठा आर्थिक फटका बसत असल्याने जिल्हाध्यक्ष अनिलराव औताडे यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३४१, १४३, १८८ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १३५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. जिल्हाध्यक्ष अनिलराव औताडे व तालुकाध्यक्ष युवराज जगताप यांनी शासन निर्णयानुसार हे खटले मागे घेण्यासाठी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांकडे पाठपुरावा केला. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२१ अन्वये न्यायालयात अर्ज दाखल केला. सार्वजनिक हित आणि सामाजिक सलोखा कायम राखण्याच्या दृष्टीने खटले मागे घेण्यास न्यायालयाने संमती दिली. परिणामी सर्व आरोपींची मुक्तता करण्यात आली असून त्यांचे जामीनबंधही रद्द करण्यात आले. या प्रकरणात शेतकरी संघटनेचे कायदेशीर सल्लागार ॲड. प्रशांत कापसे, ॲड. धनवटे तसेच श्रीरामपूर वकील संघाचे अध्यक्ष संदीपराव चोरमल यांनी काम पाहिले. शासनाच्या निर्णयाचे शेतकरी संघटना व दूध उत्पादकांनी स्वागत केले असून प्रशासनाच्या सहकार्याबद्दलही समाधान व्यक्त करण्यात आले.

# नगर - मनमाड महामार्गाचे काम पूर्ण करण्याचे प्रत्यक्ष पांडुरंगाला साकडे !

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर मनमाड महामार्गाची गेल्या अनेक वर्षापासून साडेसाती काही संपेना गेल्या महिना दीड महिन्यापूर्वी झालेल्या या रस्त्याची पहिल्याच पावसात दाणादान झाली असून या रस्त्याने आषाढी एकादशीच्या यात्रेच्या निमित्तानेश्रीक्षेत्र पंढरपूरला जाणाऱ्या विठू माऊलीच्या हजारो भाविक भक्तांना या रस्त्यावरून जाताना मोठ्या प्रमाणात त्रास झाला आहे. रस्त्याची अक्षरशः पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात चाळणी झाली असून परत एकदा प्रवाशांसाठी नगर मनमाड महामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे. यावर आता अनेक वेळा अधिकारी आमदार खासदार या सर्वांनी मिळून लक्ष घातले तरीसुद्धा या रस्त्याची दैना काही संपेना.

त्यामुळे समस्त राहुरीकरांनी हेचि दान देगा देवा आता विसर न पडावा या म्हणी प्रमाणे वारकऱ्यांमार्फत पंढरपूरच्या विठू माऊलीच्या चरणी ही प्रार्थना करून आमचा रस्ता जाण्या-येण्यायोग्य करावा अशी आळवणी पंढरपूरच्या पांडुरंगाला सर्वच वारकऱ्यांनी करावी अशा आशयाचा बोर्ड नगर - मनमाड महामार्गावर लावण्यात आला. या फलकाकडे प्रवाशांसह सर्व वारकरी व जाणाऱ्या येणाऱ्या सर्वांचेच लक्ष वेधले जात आहे. या रस्त्याला वैतागून आता राहुरीकरांनी वारकऱ्यांमार्फत प्रत्यक्ष पंढरपूरच्या पांडुरंगाला हा रस्ता होण्यासाठी साकडे घातले आहे.




# ४८ वर्षांची अखंड वारकरी सेवा

## सेवायज्ञात हजारो वारकऱ्यांना अन्नदान




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : पंढरपूर आषाढी वारीनिमित्त पांढरीचा पूल परिसरात गेल्या ४८ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या वारकरी सेवा उपक्रमाने यंदाही सेवाभावाची परंपरा कायम राखली. स्वर्गीय तुकाराम गडाख यांनी सुरू केलेला हा सेवायज्ञ हनुमान ग्रामीण संशोधन संस्थेचे युवा नेते रविराज गडाख आणि संस्थेच्या सचिव जयश्रीताई गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

यात्रेदरम्यान सलग सात ते आठ दिवस वारकऱ्यांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी, निवासाची व्यवस्था, आरोग्य सेवा आणि सात्विक अन्नदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यंदा सुमारे ४८ हजार वारकऱ्यांनी या सेवांचा लाभ घेतला. मानव सेवा हीच ईश्वर सेवा या भावनेतून कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता हा उपक्रम राबविण्यात आला.

या सेवायज्ञात विविध सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांसह परिसरातील नागरिकांनी स्वयंसेवक म्हणून सहभाग नोंदवला. तसेच हनुमान ग्रामीण संशोधन संस्थेतील सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांनाही सात्विक अन्नदान व ज्ञानेश्वरीच्या संस्कारातून भक्तिमार्गाची प्रेरणा देण्यात आली.

चार दशकांहून अधिक काळ अखंड सुरू असलेल्या या सेवा उपक्रमामुळे वारकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, नेवासा तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात या सेवायज्ञाची विशेष चर्चा होत आहे.

# ख्रिस्ती धर्माची बदनामी थांबवा

## चौकशीची मागणी : अप्पर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर येथे घडलेल्या कथित धर्मांतर प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ख्रिस्ती धर्माची बदनामी केली जात असल्याचा आरोप करत ख्रिस्ती मिशन चर्च बचाव समितीच्या वतीने अप्पर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना निवेदन देण्यात आले. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच ख्रिस्ती धर्माबाबत दिशाभूल करणारी माहिती पसरविणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, श्रीरामपूर येथे घडलेल्या कथित धर्मांतर प्रकरणाबाबत काही माध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांमध्ये आरोपींनी पीडितेला चर्चमधील पाणी पाजून बायबलच्या पाया पडण्यास भाग पाडल्याचा उल्लेख करण्यात आला.

मात्र, या वृत्तांची कोणतीही शहानिशा न करता प्रसिद्धी देण्यात आल्याचा आरोप समितीने केला आहे. समितीच्या म्हणण्यानुसार, संबंधित आरोपी मोहन आडांगळे व व्यंकटेश आडांगळे हे ख्रिस्ती धर्मीय नसून, ख्रिस्ती धर्मात अथवा चर्चच्या धार्मिक विधींमध्ये अशा प्रकारची कोणतीही प्रथा अस्तित्वात नाही. त्यामुळे या घटनेच्या माध्यमातून ख्रिस्ती धर्माची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.



या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच चौकशीत आरोप सिद्ध न झाल्यास खोटे आरोप करणाऱ्या व्यक्ती किंवा संबंधितांवरही कायद्यानुसार कारवाई करून ख्रिस्ती समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी समितीने केली.

यावेळी प्रविणराजे शिंदे, दीपक कदम, रेव्हरंट अण्णासाहेब अमोलिक, पास्टर पिटर बनकर, रवींद्र लोंढे, सुनील बोरगे, एस. पी. पंडित, प्रकाश निकाळे, फ्रान्सिस साळवे, कार्तिकी चांदेकर, अजय गायकवाड, निशिकांत पंडित, शैलेश अमोलिक, विजय त्रिभुवन, इग्नाती रूपटक्के, सुभाष खरात, संतोष तुपे, सागर जोगदंड, बबन जाधव, राजेश खडक, सुरेश ठुबे, विजय बार्शे, बाळासाहेब जाधव, विल्सन बोर्डे आदींसह ख्रिस्ती समाजातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# वारकऱ्यांच्या सेवेत साईछत्र उद्योग समूह

## १० हजार भाविकांसाठी अन्नदानाचा महायज्ञ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**प्रवरानगर** : वारी म्हणजे भक्ती, तर सेवा म्हणजे त्या भक्तीचे खरे सार, या भावनेतून श्री संत निवृत्ती महाराज पालखी सोहळ्यानिमित्त श्री साईछत्र उद्योग समूहाचे संचालक गणपतराव भोसले व त्यांच्या मित्र परिवाराने मिरपूर येथे हजारो वारकऱ्यांसाठी अन्नदान व सेवा उपक्रम राबवत सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आदर्श घालून दिला. या उपक्रमात सुमारे १० हजार वारकऱ्यांना गरमागरम वडापाव, जलेबी आणि पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. पालखी मिरपूर येथे दाखल होताच स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध नियोजनातून भाविकांचे स्वागत केले.

वारकऱ्यांच्या भोजनाची, विश्रांतीची आणि पिण्याच्या पाण्याची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी मोठा मंडप, बसण्याची व्यवस्था तसेच स्वतंत्र वितरण केंद्र उभारण्यात आले होते. दिवसभर स्वयंसेवकांनी न थकता सेवा बजावत प्रत्येक वारकऱ्यापर्यंत नाश्ता व पाणी पोहोचविले. मुसळधार पावसाची शक्यता असूनही संपूर्ण उपक्रमात कुठेही गोंधळ किंवा गैरव्यवस्था दिसून आली नाही. नियोजनबद्ध व्यवस्थापन, स्वच्छता आणि सेवाभावामुळे वारकऱ्यांनी आयोजकांचे भरभरून कौतुक केले. अनेक वारकऱ्यांनी अशी सेवा म्हणजेच विठ्ठलाची खरी पूजा, अशा भावना व्यक्त केल्या. वारकरी संप्रदायात सेवा हीच ईश्वरभक्ती मानली जाते. त्याच परंपरेचा वारसा जपत श्री साई उद्योग समूहाने राबविलेला हा सेवा उपक्रम केवळ अन्नदानापुरता मर्यादित न राहता समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची जाणीव करून देणारा ठरला. नंदूशेठ रनमाळे. नानासाहेब पुलाटे,रोहन तांबे,प्रमोद ढगे, शैनेश भोसले तसेच दत्तू रणमाळे,गणपतराव भोसले,लोणी व लोहारे मित्रपरिवार यांनी आर्थिक मदतीबरोबरच स्वतः उपस्थित राहून संपूर्ण व्यवस्थेवर लक्ष ठेवले. भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, प्रत्येकाला सन्मानाने सेवा मिळावी आणि वारीचा आनंद अखंड राहावा, यासाठी स्वयंसेवकांनी दिवसभर अथक परिश्रम घेतले. त्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीमुळे संपूर्ण परिसरात सेवाभावाचे प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

## त्रिमूर्ती महाविद्यालयात करिअर संसद पदाधिकाऱ्यांचा शपथविधी उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत करिअर संसद पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला. दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. करिअर कट्टा उपक्रमाची उद्दिष्टे, करिअर नियोजनातील महत्त्व आणि कौशल्य विकासाची गरज याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे यांनी अध्यक्षीय भाषणात आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी नव्हे, तर संवादकौशल्य, नेतृत्व, वेळेचे व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. वरिष्ठ महाविद्यालयाच्या समन्वयिका डॉ. अनुराधा गोरे यांनी करिअर कट्टा हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासह उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, उद्योजकता आणि रोजगाराच्या संधींसाठी मार्गदर्शक उपक्रम असल्याचे सांगितले.

## हरवले आहे

ओरिजनल १२वी चा दाखला, १२वी चे प्रमाणपत्र शेवगाव - पुणे प्रवासादरम्यान एसटी स्टॅंडवर हरवले आहे. तरी कोणाला आढळल्यास संपर्क करा.

**भुषण तान्हाजी भालेराव**
रा. शेवगाव, ता. शेवगाव
जि. अहिल्यानगर
मो. ९३७०७८४२३०

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मी वर्षा प्रफुल्ल शिंगाडे वय ३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. धारणगावरोड, माधव बाग, सुभाष नगर, कोपरगाव, जि. अहिल्यानगर पिन कोड ४२३६०१, या ठिकाणची रहिवाशी असून माझे पती नामे कै. प्रफुल्ल सोमनाथ शिंगाडे हे दिनांक २९/०६/२०२५ रोजी, धारणगावरोड, माधव बाग, सुभाष नगर, कोपरगाव, जि. अहिल्यानगर पिन कोड ४२३६०१, येथे मयत झाले आहे. त्यांच्या नावे हुंडई या कंपनीची आय 20 ASTA CRDI ही चारचाकी वाहन (कार) तिचा रजिस्ट्रेशन नं. MH-12-NJ-9884 असा आहे.

मयत प्रफुल्ल सोमनाथ शिंगाडे यांना त्यांची पत्नी नामे वर्षा प्रफुल्ल शिंगाडे या कायदेशीर वारस असून त्या सज्ञान आहेत. सदरचे वाहन माझ्या (वर्षा प्रफुल्ल शिंगाडे) नावे ट्रान्सफर करणे कामी अर्ज व मृत्युखबले इत्यादी सर्व कागदपत्रे आर. टी. ओ. ऑफिस श्रीरामपूर या कार्यालयात मी दाखल केलेले आहेत.

मयत प्रफुल्ल सोमनाथ शिंगाडे यांचे हुंडई या कंपनीची आय 20 ASTA CRDI ही चारचाकी वाहन (कार) रजिस्ट्रेशन नं. MH-12-NJ-9884 त्याची असलेली वारस पत्नी वर्षा प्रफुल्ल शिंगाडे यांच्या नावे ट्रान्सफर करण्याकामी कोणाचीही काहीही हरकत, अधिकार, हक्क वगैरे असल्यास संबंधितांनी आपल्या हरकती, तक्रारी वगैरे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आर.टी.ओ. ऑफिस श्रीरामपूर अथवा वर्षा प्रफुल्ल शिंगाडे, वय - ३६ वर्षे, धंदा - घरकाम, रा. धारणगावरोड, माधव बाग, सुभाष नगर, कोपरगाव, जि. अहिल्यानगर पिन कोड ४२३६०१, (मो. नं. ९०२८६६५००६) यांच्याकडे ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधून सदर कागदपत्र व हरकत प्रत्यक्ष सादर करावेत. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास, त्यांनी सदरचा हरकत, अधिकार, हक्क वगैरे जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिद्धीस दिली तारीख ०९/०७/२०२६

**श्रीमती वर्षा प्रफुल्ल शिंगाडे**

## जाहीर प्रगटन

समस्त गावकरी कोरेगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम मोषमा नंदुसिंग परदेशी रा कोरेगाव ता. कर्जत.जि. अहिल्यानगर. यांनी स्वतः नामे श्री. श्रीम.मोषमा नंदुसिंग परदेशी यांचे नावे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म/मृत्यू कोरेगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि २१/०६/१९९३ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबंधीत दि ३०/०३/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**रवि सतवन**
**तहसिलदार कर्जत**

# राहुरी नगरपरिषदेत सत्ताधाऱ्यांकडून भाजपच्या नगरसेवकांना कोंडीत पकडण्याचे प्रयत्न !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी नगरपालिकेच्या सत्ताधारी गटाकडून विरोधी गटाच्या नगरसेवकांच्या वार्डमधील विकास कामात त अडथळे आणून त्यांना दुजाभावाची वागणूक दिली जात असुन कुठल्याच कामांत विचारत घेतलें जात नसल्याने शहरातील विश्वास ठेवून ज्यांनी आम्हाला निवडून दिले त्या नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे तसेच पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडुनही नगरसेवकांना दुजाभावाची वागणुक मिळत असल्याचा आरोप करत जर त्यांच्या कारभारात सुधारणा झाली नाहीं तर आम्हाला आंदोलनात्मक भुमिका घ्यावी लागणार असल्याचा इशारा भाजप पुरस्कृत परिवर्तन गटाच्या गटाच्या नगरसेविका व नगरसेवकांनी आंदोलन करण्याचा इशारा पत्रकार परिषदेत सत्ताधारी गटाला दिला आहे.

स्व. शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून शहरातील १३ विविध विकास कामे मंजूर आहे मात्र याची वर्क आर्डर नाही, असा आरोप सचिन भोंगळ व सुजय काळे यांनी केला. आमच्या वार्डात रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे वेळोवेळी अर्ज करतो पण दखल घेतली जात नाही नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, हे आमच्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. नगरपरिषदेच्या मागिल बाजुला ग्रामिण रुणालय समोर शौचालयाची दुरावस्था झाली असुन कुठलीच सोय नाही, तर अनेक वेळा विविध कामांसाठी डजनभर अर्ज दिले आहेत पण माझ्या कामाकडे दुर्लक्ष केले जाते बाकिच्या कामाला प्राधान्य दिले जाते पण आमच्या कामांना प्राधान्य दिले जात नाही असे म्हणून नगरसेविका प्रसन्ना वराळे यांनी डझन भर अर्ज केल्याची पोहोच यावेळी पत्रकार परिषदेत दाखविली.




पत्रकार परिषदेत गटनेते राजेंद्र उंडे, विरोधी पक्ष नेते अरुण साळवे, यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली. शहरातीलआमचे नगरसेवक असलेल्या कुठल्याच वार्डमध्ये विकास कामांच्या बाबतीत सत्ताधाऱ्यांकडून कुठलीही हालचाल होत नाही व जाणून लिहून आमच्या नगरसेवकांचा वार्डमध्ये कामे प्रलंबित ठेवण्याचा कारभार सत्ताधारी करीत असल्याचा घनाघाती आरोप त्यांनी सत्ताधाऱ्यांवर केला असून यामध्ये सुधारणा झाली नाही तर आंदोलन उभारणार असल्याचा इशारा यावेळी पत्रकार परिषदेत दिला आहे.

यावेळी परिवर्तन गटाचे गटनेते राजेंद्र उंडे, विरोधी पक्षनेते अरुण साळवे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष जेष्ठ नेते प्रकाश पारख, सचिन भोंगळ, विक्रम भुजाडी, अमोल काशीद, सुजय काळे, सुनिल पवार, सतिष फुलसौंदर, अक्षय तनपुरे, सचिन मेहेत्रे, नयन शिंगी, राजेंद्र वराळे, नगरसेविका प्रियंका काशिद, सिंधुताई डावखर, मनीषा भोंगळ, मनीषा बर्डे, प्रसन्ना वराळे, यांच्यासह दिनेश उंडे, कांतीलाल जगधने, उमेश शेळके, अजित डावखर, अरूण डौले, बाबासाहेब शिंदे, आदि उपस्थित होते.

आमच्या पाच नगरसेवीकांना सन्मान दिला जात नाही मिंटीग मधे आमच्या वार्डमधील कुठल्याही विकास कामा संबंधित वारंवार मुख्याधिकारी व अध्यक्ष यांच्याकडे मागणी करूनही आमच्या वार्डमधील विकास कामात कुठलीही हालचाल करण्यात येत नाही व आमच्या वार्डमधील कामे होत नाही. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. संक्रातीच्या हळदीकुंकूवाचा कार्यक्रम नगरपरिषदेच्या निधीमधून केला जातो. परंतु आमच्या पाच नगरसेविकांना जाणून बुजून या कार्यक्रमासाठी टाळले जाते. प्रत्येक वेळी आम्ही वार्डमधील विकास कामासंबंधी तक्रार अर्ज करुनही दखल घेतली जात नाही, कामा बाबत दुर्लक्ष केले जाते यामुळे वार्डमधील नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. या सर्व तक्रारींची दखल सत्ताधाऱ्यांनी घ्यावी अन्यथा आम्ही आंदोलन पुकारणार .

**प्रियांका काशिद, नगरसेविका , राहुरी नगर परिषद**

## पान १ वरुन

### पंढरपूर वारीत चापडगावच्या वारकऱ्याचा मृत्यू

त्यास जवळच्या शिरूर - कासारमध्ये उपचारासाठी दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी बीड येथे हलवण्यास सांगितले मात्र बीडमधील डॉक्टरांनी भारत यास मृत घोषित केले. मयत भारतच्या पाचात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी व भाऊ , भावजाई असा मोठा परिवार आहे. मयत वारकरी भक्ताच्या कुटुंबास शासनाकडून निधी मिळावा अशी मागणी चापडगाव परिसरातील नागरिकांतून होत आहे.

### पेट्रोल पंप डीलरशिपचे फेसबुक आमिष...

जामखेड येथे येऊन पेट्रोल पंपासाठी प्रस्तावित जागेची पाहणी केल्याचे नाटक केले. मात्र त्यानंतर संबंधितांनी संपर्क तोडला. फोन व संदेशांना प्रतिसाद मिळेनासा झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच उदय शिंदे यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली.या तक्रारीच्या आधारे सायबर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून, पोलीस निरीक्षक सागर ढिकले पुढील तपास करत आहेत.

### शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचा डाव : सपकाळ

या माध्यमातून शिक्षणाचे बाजारीकरण करून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकारी शाळा वाचविण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.मतदारसंघ पुनर्रचना हे विधेयक देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण करणारे आहे. या विधेयकाच्या माध्यमातून उत्तर आणि दक्षिण भारतात राजकीय दरी निर्माण करण्याचा भाजपाचा प्रयत्न असल्याचा दावा त्यांनी केला. काँग्रेसने या विधेयकाला आधीपासूनच विरोध दर्शविला असून संसदेत त्याविरोधात भूमिका स्पष्टपणे मांडल्याचे त्यांनी सांगितले. भाजपाला 'वन नेशन, वन पॉलिटिकल पार्टी' ही व्यवस्था देशात आणायची आहे, असा आरोपही त्यांनी केला.सोनम वांगचुक यांच्या आंदोलना संदर्भात सपकाळ म्हणाले की, त्यांनी उपस्थित केलेल्या मागण्यांशी काँग्रेस सहमत आहे. नीट परीक्षा पेपरफुटीच्या मुद्द्यावर काँग्रेसने देशव्यापी आंदोलन सुरू केले असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी कायम असल्याचे त्यांनी सांगितले. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या छात्रों की गुंज अभियानाचा पुढील टप्पा १७ जुलै रोजी डेहराडून येथे होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

### एम.डी. ड्रग्स तस्कराला अटक २.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

टास्क फोर्सचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, सोहेल शेख हा तरुण पांढऱ्या रंगाच्या मोपेडवरून नांदूर शिवार येथील अस्तगाव फाट्यावर एम.डी. ड्रग्ज विक्रीसाठी येणार आहेत. या माहितीची पडताळणी करून पथकाने तातडीने श्रीरामपूर शहर पोलिसांना सतर्क केले. पोलीस निरीक्षक विशाल खैरे, सपोनि राम शिखरे, महिला अंमलदार मीरा सरग आणि एलसीबीच्या पथकाने परिसरात सापळा रचला. संशयित सोहेल तिथे येताच पोलिसांनी त्याला वेढा घालून ताब्यात घेतले.या झडती दरम्यान, सोहेलच्या ताब्यातून ४.८३ ग्रॅम वजनाचे एम.डी. ड्रग्ज सापडले. पोलिसांनी त्याच्याकडून खालील वस्तू जप्त केल्या आहेत.एम.डी. ड्रग्ज ४.८३ ग्रॅम (किंमत ९६,६०० रुपये),रोख रक्कम ६,२०० रुपये, मोबाईल फोन ५०,००० रुपये,मोपेड दुचाकी १,००,००० रुपये, २,५२,८०० किंमतीचा असा एकुण मुद्देमाल जप्त करण्यात आला. या चौकशी दरम्यान सोहेलने हे ड्रग्ज बेलापूर (ता. श्रीरामपूर) येथील असीफ मुनीर शेख याच्याकडून आणल्याची कबुली दिली. पोलिसांनी असीफवर गुन्हा दाखल केला असून, तो सध्या फरार आहे. पोलीस पथक त्याचा कसून शोध घेत आहेत.या प्रकरणी पोलीस अंमलदार रमीजराजा आतार यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, पो.नि. संतोष मुटकुळे आणि पो.नि. विशाल खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि.अनंत सालगुडे, स.पो.नि.राम शिखरे, मीरा सरग, अतुल लोटके, बिरप्पा करमल, रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, रमीजराजा आतार, विशाल तनपुरे आणि चालक भगवान धुळे यांच्या पथकाने केली. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.

### शाळकरी मुलीचा पाठलाग करून विनयभंग!

तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि आरोपीला ताब्यात घेतले. दरम्यान, घटनेची माहिती समजताच ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. आरोपीला आपल्या ताब्यात देण्याची मागणी करत ग्रामस्थांनी पोलिसांच्या गाडीसमोर ठिय्या मांडला. काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पोलिसांनी संयम राखत जमावाला शांत केले आणि कायदेशीर कारवाईचे आश्वासन दिले.याप्रकरणी पिडीत मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून, राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी आरमान जब्बार शेख (रा. तुळापूर, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा रजि. नं. ७९०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (बी.एन. एस) कलम ७४, ७५ (२), ७८, ३५१ (२), ३५२ आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ च्या कलम ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र लवांडे करत आहेत. ग्रामस्थांचा तीव्र संताप, गावांनी ठेवला कडकडीत बंद- राहुरी तालुक्यात तुळापूर येथील एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका अल्पवयीन शाळकरी विद्यार्थिनीचा रस्त्यात अडवून विनयभंग करण्यात आल्याची घटना बुधवारी संध्याकाळी घडली. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात संतापाची लाट उसळली असून, या निषेधार्थ तुळापूर आणि निंभेरे या दोन गावांनी कडकडीत बंद पाळला.

# कोटी रुपयांच्या कामाची १५ मिनिटांत पाहणी ; गुणवत्तेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

## वैजापूर पंचायत समितीत मोठा गोंधळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** पंचायत समिती कार्यालय व कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानांच्या देखभाल व दुरुस्ती कामाच्या गुणवत्तेबाबत पुन्हा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी आढावा बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना कामाच्या निकृष्ट गुणवत्तेबाबत फटकारले होते. त्यानंतर बुधवारी जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता व अन्य अधिकाऱ्यांचे पथक पंचायत समिती परिसराच्या पाहणीसाठी आले. मात्र सुमारे एक कोटी रुपयांच्या कामाची पाहणी अवघ्या १५ मिनिटांत आटोपून पथकाने केवळ तोंडी सूचना देत परिसर सोडल्याने पाहणीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सन २०२३-२४ मधील २५१५ ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत पंचायत समिती इमारत, कर्मचारी निवासस्थाने व परिसरातील दुरुस्ती आणि विकासकामांसाठी सुमारे एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या कामात ड्रेनेज दुरुस्ती, पाणीपुरवठा व्यवस्था, ओव्हरहेड टाकी, शौचालय दुरुस्ती, रंगकाम, कंपाउंड वॉल, पेव्हर ब्लॉक व अंतर्गत रस्त्यांचा समावेश होता.

प्रत्यक्ष पाहणीत अनेक ठिकाणी रंगकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिसून आले. पेव्हर ब्लॉक मर्यादित भागातच टाकण्यात आले असून अनेक निवासस्थानांची फरशी खराब अवस्थेत आहे. विशेष म्हणजे ३० शासकीय निवासस्थानांपैकी केवळ एका घराची पाहणी करण्यात आली. ड्रेनेजची प्रत्यक्ष तपासणी न करता छायाचित्रांवर समाधान मानण्यात आले आहे.



या पार्श्वभूमीवर नागरिकांनी संपूर्ण कामाची स्वतंत्र तांत्रिक चौकशी, प्रत्यक्ष भौतिक पडताळणी, प्रयोगशाळेत गुणवत्ता तपासणी तसेच मोजमाप पुस्तिका, देयके आणि वापरलेल्या साहित्याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. सरकारी निधीतील विकासकामांत पारदर्शकता व दर्जा सुनिश्चित करण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# देवगड संस्थानच्या पंढरपूर मठात सोमवारपासून नामदेव गाथा पारायण सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा:** आषाढी वारीनिमित्त नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड संस्थानच्या वतीने पंढरपूर येथील मठामध्ये श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा पालखीनिमित्ताने राष्ट्रसंत भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या नेतृत्वाखाली अखंड हरिनाम सप्ताह व नामदेव गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन दि.२० जुलै ते दि.२६ जुलै या कालावधीत करण्यात आले आहे. यानिमित्त सोमवारी पंढरपूर येथील मठापासून श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांची पालखी दिंडी क्षेत्र प्रदक्षिणा करण्यासाठी निघणार आहे.

पंढरपूर येथे होणाऱ्या सात दिवशीय नामदेव गाथा पारायण व पंढरपूर क्षेत्र प्रदक्षिणा दिंडी सोहळयासाठी भाविक हे दि.१९ जुलै रोजी पंढरपूरला जाण्यासाठी आपापल्या वाहनांनी प्रस्थान करणार आहे.या दिवशी सर्व भाविक हे पंढरपूर येथील देवगड मठामध्ये रात्री मुक्कामासाठी जमतील. दि.२० जुलै रोजी सकाळी ७ वाजता गुरूदेव दत्त पिठाचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरच्या देवगड मठापासून पंढरपूर नगरीत क्षेत्र प्रदक्षिणा करण्यासाठी श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांची पालखी दिंडी निघणार आहे.

क्षेत्र प्रदक्षिणा दिंडीचे हे पाचवे वर्ष आहे. क्षेत्र प्रदक्षिणा दिंडीचा समारोप पंढरपूरच्या देवगड मठात करण्यात येईल. त्यानंतर येथे सात दिवस नामदेव गाथा पारायण सोहळयास सुरूवात होणार आहे. यावेळी सकाळी ४ ते ६ काकडा, आरती, सकाळी ७ ते ८ गीता पठण,९ ते ११ श्री नामदेव गाथा पठण,११ ते १२ भोजन प्रसाद,दुपारी ३ ते ५ श्री नामदेव गाथा पारायण,सायंकाळी ५.३० ते ७ हरिपाठ, आरतीनंतर भोजन, रात्री ८.३० ते १० कीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे

पंढरपूर येथे होणाऱ्या गाथा पारायण सोहळयासाठी व्यासपीठ प्रमुख देवगडचे संतसेवक हभप नारायण महाराज ससे,हभप गणपत महाराज आहेर,हभप रामनाथ महाराज






पवार, हभप संजय महाराज निथळे,मृदुंगाचार्य गिरीजीनाथ महाराज जाधव,बाळू महाराज कानडे,तात्या महाराज शिंदे,लक्ष्मण महाराज नांगरे, रोहित महाराज पटारे,गणेश महाराज तनपुरे,शशिकांत महाराज कोरेकर, सोमनाथ महाराज पानकडे यांच्यासह देवगड संस्थानचे विद्यार्थी मंडळ हे सेवा देणार आहे.या सोहळयाची जय्यत तयारी पंढरपूर येथील देवगड मठामध्ये सुरू झाली आहे.

## निधन वार्ता

### यशोदा भनगडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव :** श्रीरामपुर तालुक्यातील उंदिरगाव येथील यशोदा पांडुरग भनगडे (८० वय) यांचेवृध्दापकाळाने निधन झाले. त्याच्या पश्चात



पती मुले ३ सुना नातवंडे असा मोठा परीवार आहे. येथील सामाजीक कार्यकर्ते पाडुरंग भनगडे याच्या त्या पत्नी तर विष्णु 'कृष्णा' संजय भनगडे यांच्या मातोश्री व बबन भनगडे (पुरवठा अधिकारी) यांच्या आजी व अनिल भनगडे व भाजपा पंचायत राजग्रामविकास जिल्हाध्यक्ष अध्यक्ष याच्या त्या चुलती होत.

### दामोदर साळवे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** शहरातील महात्मा गांधी विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक दामोदर साळवे (वय



८५) यांचे गुरुवारी वृद्धपकाळाने निधन झाले. गरीब विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक म्हणून ते विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना-जावई, नातवंडे असा परिवार आहे. कर्जत शहरातील प्रसिद्ध स्त्री-रोगतज्ञ डॉ नितीन साळवे यांचे ते वडील होत.

# गोवंशाची अमानुष वाहतूक उघड

## पोलिसांची मध्यरात्री धडक कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** वैजापूर-शिऊर मार्गावरील एमआयटी महाविद्यालयाजवळ बुधवारी मध्यरात्री गोवंशाची अमानुष पद्धतीने वाहतूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. डायल ११२ वर मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वैजापूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत धडक कारवाई केली. या कारवाईत तीन पिकअप वाहने अडवून त्यांची तपासणी केली असता जर्सी जातीच्या आठ गायी व वासरे दोऱ्यांनी घट्ट बांधून, अत्यंत कोंदट आणि हालचालही करता येणार नाही अशा अवस्थेत कोंबून नेले जात असल्याचे समोर आले. या प्रकरणी पोलीस कर्मचारी शुभम रावते यांच्या फिर्यादीवरून वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात जनावरांना प्रवासादरम्यान ना चारा देण्यात आला होता, ना पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. जनावरांना निर्दयीपणे कोंबून वाहतूक केल्याने त्यांना मोठा शारीरिक त्रास होत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे प्राणी कल्याणाबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. कारवाईदरम्यान एमएच-२०-ईजी-१६२४, एमएच-०४-एफयू-९३०७ आणि एमएच-०४-केएफ-३९०५ क्रमांकाची तीन पिकअप वाहने जप्त करण्यात आली. पहिल्या वाहनात दोन गायी, दुसऱ्या वाहनात तीन गायी व एक वासरू, तर तिसऱ्या वाहनात एक गाय आणि दोन वासरे असा एकूण आठ गोवंश आढळून आला. जप्त वाहने आणि जनावरांची एकूण अंदाजित किंमत ६ लाख ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणी सुनील मनोहर मखरे (रा. टाकळी, ता. सिल्लोड), जुबेर फरीद कुरेशी आणि आसिफ भिकन शाह (दोघे रा. पिशोर, ता. कन्नड) यांची नावे समोर आली असून त्यांच्याविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यात येत आहे. जप्त करण्यात आलेल्या जनावरांची सुरक्षित व्यवस्था करण्यात आली असून या वाहतुकीमागील नेमके कारण, जनावरे कुठून आणण्यात आली आणि कुठे नेली जात होती, याचा सखोल तपास वैजापूर पोलीस करत आहेत. वैजापूर परिसरात गोवंशाच्या बेकायदेशीर आणि क्रूर वाहतुकीच्या घटना अधूनमधून समोर येत असल्याने अशा प्रकारांवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# एमडीएस परीक्षेत यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालयाची राज्यात बाजी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**घोडेगाव ।** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या एमडीएस (मास्टर ऑफ डेंटल सर्जरी) २०२४-२५ पदव्युत्तर परीक्षेच्या निकालात अहिल्यानगर येथील यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालयाने राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या पदव्युत्तर कॉन्झर्वेटिव्ह विभागातील डॉ. पंजक डेबाडवार यांनी राज्यात प्रथम, तर डॉ. पूजा खाकाळ यांनी द्वितीय क्रमांक पटकावत महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीत अव्वल दोन क्रमांक मिळविल्याने महाविद्यालयासह मुळा एज्युकेशन संस्थेत आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या यशाबद्दल संस्थेच्या उपाध्यक्षा कु. नेहल प्रशांत गडाख पाटील, मुळा एज्युकेशनचे उपाध्यक्ष उदयन शंकरराव गडाख पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष देवढे पाटील तसेच महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. निलिमा श्रीपाद राजहंस यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गुणवत्तापूर्ण शिक्षण, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि अत्याधुनिक शैक्षणिक सुविधांच्या बळावर यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालयाने राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. एमडीएस परीक्षेतील हे यश महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय ठरल्याची भावना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

### जिल्हा बँकेच्या निवडणुकीला उच्च न्यायालयात आव्हान

श्रीरामपूरसह जिल्ह्यातील अनेक विकास संस्था थकबाकीत असल्याने मोठ्या संख्येने प्रतिनिधी अपात्र ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक संस्थांनी पर्यायी प्रतिनिधी निवडण्याची प्रक्रिया सुरू केली होती. अशा वेळी उच्च न्यायालयाने नोटीस बजावल्याने संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील आठवड्यात होणाऱ्या सुनावणीकडे सहकार क्षेत्रासह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### बंगालच्या उपसागरात रोहिंग्याच्या दोन नौका उलटल्या

संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांनी नमूद केले की, मुसळधार पाऊस, पूरस्थिती आणि समुद्रातील उंच लाटांमुळे समुद्रमार्गे प्रवास अत्यंत धोकादायक बनला होता. त्यामुळे ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या दुर्घटनेची अधिकृत पुष्टी झाल्यास, रोहिंग्या निर्वासितांच्या इतिहासातील ही सर्वात मोठ्या सागरी दुर्घटनांपैकी एक ठरू शकते, असेही संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांनी म्हटले आहे.

# विस्थापितांच्या आंदोलनास डॉ पिपाडा यांची भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** येथील चारी क्रमांक ११ वरील अतिक्रमण बाधित सर्वसामान्य कुटुंबांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी निमगाव कोऱ्हाळे येथील ग्रामस्थ राहाता पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसले आहेत. अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या या कुटुंबांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी भाजपाचे नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी उपोषण स्थळी प्रत्यक्ष भेट देत आंदोलकांची विचारपूस केली. डॉ. पिपाडा यांनी राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गुंड व वरिष्ठ अधिका-यांशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून आंदोलकांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची व गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची सूचना केली.उपोषणकर्त्यांनी सादर केलेल्या मागण्यांमध्ये प्रामुख्याने शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, पात्र लाभार्थ्यांना घरे मंजूर करावीत, सर्वेक्षण पूर्ण करून न्याय्य पुनर्वसन करावे . डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी यावेळी सांगितले की, ''गोरगरीब आणि सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होऊ देणार नाही. शासनाच्या



निकषांनुसार पात्र असलेल्या प्रत्येक कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी मी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार असून, या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा निघावा यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील.''सध्या या आंदोलनाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून आंदोलकांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी सर्वसामान्य नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नाट्यगृहाचे नाव बदलता कामा नये आ. काळेंचे नगरपालिका प्रशासनाला निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहरात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह उभारले जाणार आहे. त्या जागेचा करार शासनाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे यदाकदाचित नाट्यगृहाची जागा जरी बदलावी लागली तरी चालेल पण ज्या ठिकाणी नाट्यगृह होणार त्या नाट्यगृहाचे नाव बदलता कामा नये असे स्पष्ट निर्देश आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपालिका प्रशासनाला दिले.



साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक लोकार्पण, नाट्यगृह आणि समाज मंदिर उभारणी आदी मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला गुरुवार (दि.१६) रोजी आ.आशुतोष काळे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आंदोलनकर्त्यांची भेट घेवून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. यावेळी ते म्हणाले की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे लोकार्पण कधी आणि कशा पद्धतीने करायचे याचा निर्णय संपूर्ण समाज बांधवांनी एकत्रित बसून घ्यावा. लोकार्पण कार्यक्रम कधी घ्यायचा व कसा घ्यायचा याची रूपरेषा सांगा. सर्वानुमते होणारा हा निर्णय नगरपालिका प्रशासनाला कळवा. त्याप्रमाणे समाज बांधवांच्या मागणी प्रमाणेच नगरपालिका प्रशासन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे लोकार्पण सोहळ्याची अंमलबजावणी करेल अशी ग्वाही आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी आंदोलनकर्त्यांना दिली. तसेच कोपरगाव शहरात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य नाट्यगृहाच्या उभारणीसाठी ५ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत ज्या जागेवर हे नाट्यगृह उभारण्याचे नियोजन करण्यात आहे त्या जागेच्या कराराची कायदेशीर प्रक्रिया सध्या शासनाकडे प्रलंबित आहे. शासनाकडून ही करार प्रक्रिया पूर्ण होताच नाट्यगृहाचे काम युद्धपातळीवर सुरू केले जाईल. त्याबाबत माझा पाठपुरावा सुरूच असून मुख्याधिकाऱ्यांना पण पाठपुरावा करण्यास सांगितले आहे. त्याबाबत समाज बांधवांनी देखील पालिकेकडे पाठपुरावा करावा. ज्या ठिकाणी नाट्यगृहासाठी जागा उपलब्ध होईल त्या ठिकाणी नाट्यगृह बांधा परंतु नाट्यगृहाच्या नावात कोणताही बदल न करता या नाट्यगृहाला साहित्यरत्न डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हेच नाव राहिले पाहिजे असे स्पष्ट निर्देश आ.आशुतोष काळे यांनी आंदोलनकर्त्यांच्या समक्ष कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजित निकट यांना दिले आहे.तसेच समाज बांधवांनी समाजमंदिरासाठी जी जागा अपेक्षित धरली आहे त्या जागेबाबत मुख्याधिकारी माहिती घेवून निश्चितपणे कार्यवाही करतील असे सांगितले.

यावेळी नितीन साबळे, अर्जुन मरसाळे, फकीरा चंदनशिव, अनिल पगारे, रवींद्र डोलारे, शरद त्रिभुवन, अनिल मरसाळे, रंगनाथ मरसाळे, तेजस साबळे, नितीन ताकवले, साई आवारे, संतोष मरसाळे, सिद्धेश खडांगळे, दीपक मरसाळे, ज्ञानेश्वर घोडेस्वार, किरण गायकवाड, सचिन अहिरे, विजय मरसाळे, पप्पू उगले, योगेश उशीर, साई चंदनशिव, नगरसेवक मंदार पहाडे, संदीप कपिले, राहुल शिरसाठ, वाल्मिक लहिरे, हाजीमेहमूद सय्यद, विजय त्रिभुवन, रमेश गवळी, नितीश बोरुडे,सिद्धार्थ शेळके कोपरगाव नगरपालिका अधिकारी आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि .१७ जुलै २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|
| १२० ६७० ५८० | ३-८ | २४० २६० ३३० |
| | | जोड ३२-८६-७१-०४-६९ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|
| १५६ २४० ६६० | २-१ | १४६ १२८ ११९ |
| | | जोड २६-०१-४९-८५-१७ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|
| १५६ १६९ ११४ | ६-२ | १२९ ४८० ६६० |
| | | जोड ६९-४२-८१-३९-२० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 379 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

# द • ख • ल

## टाकळी ढोकेश्वरमध्ये घडले हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन



**टाकळी ढोकेश्वर :** हिंदू- मुस्लिम ऐक्याची परंपरा असणाऱ्या पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे वै. ह. भ. प. बबन महाराज पायमोडे यांच्या पायी दिंडीचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान होत असताना मुस्लिम बांधवांनी हजरत सुफी इस्माईलशहा बाबा दर्गाह येथे या दिंडीचे उत्साहात स्वागत केले.यावेळी दिंडी रथावर पुष्पवृष्टी करून वारकऱ्यांना अल्पोपहार देण्यात आला.दिंडी चालकांच्या वतीने बाबांच्या दर्ग्यावर चादर अर्पण करण्यात आली. यावेळी सरपंच अरुणा खिलारी, शिवाजी खिलारी, संजय उदावंत, बाबासाहेब खिलारी, रवींद्र पायमोडे, शंकर रांधवण, अशोक झावरे, भाऊसाहेब खिलारी, संतोष सोनावळे, संकेत झावरे, मळीभाऊ रांधवण, अंकुश पायमोडे, रावसाहेब झावरे, संदीप खिलारी, शिराजभाई हवलदार, चाँदशेठ इनामदार, बशीरभाई हवलदार, आदमभाई हवलदार, मुजावर उस्मानभाई, राजू शेख, साजिद पटेल, सद्दाम इनामदार, छोटूभाई हवलदार, अल्ताफ शेख, निसार शेख, आमीन पिंजारी, हर्षब मुजावर, रमजान शेख, अफसर शेख, सोहेल हवालदार, निहाल हवालदार, शाहिद शेख, फैजान मोमीन, अब्दुल हवालदार, हाफिजी सुलेमान पटेल आदींसह ग्रामस्थ, वारकरी व मुस्लिम बांधव उपस्थित होते.

## निमगाव वाघा येथील श्री नवनाथ पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



**अहिल्यानगर :** निमगाव वाघा (ता. नगर) येथील श्री नवनाथ पायी दिंडीचे ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ मृदंगाच्या गजरात श्री क्षेत्र पंढरपूरकडे नुकतेच प्रस्थान झाले. गावात भक्तीमय वातावरणात डोळे दिपवून टाकणारा रिंगण सोहळा पार पडला. या दिंडीत कल्याणच्या भाविकांसह गावाच्या पंचक्रोशीतील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. दिंडीतील भव्य रथाचे गावात जागोजागी स्वागत करुन भाविकांनी पादुकांच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. दिंडीचे हे २३ वे वर्ष आहे. याप्रसंगी साहेबराव बोडखे, अतुल फलके, गोकुळ जाधव, अनिल डोंगरे, गोरख फलके, भागचंद जाधव, सागर कापसे, मच्छिंद्र डोंगरे, डॉ. विजय जाधव, भाऊसाहेब कापसे, पिंटू जाधव, अरुण फलके, गुलाब जाधव, भरत बोडखे, संजय कापसे, जयराम जाधव, दत्तू फलके, कुमार फलके, संदिप डोंगरे, सुभाष कदम, बबन केदार, बाळू बोडखे आदींसह ग्रामस्थ, महिला वर्ग व भजनी मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुरुडगावात रंगला रिंगण सोहळा दिंडी ठरली आदर्श वारीचा मानबिंदू



**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील बुरूडगाव येथील पावन हनुमान मंदिर श्री क्षेत्र बुरूडगाव पायी दिंडीचे आषाढी वारीसाठी श्रीक्षेत्र पंढरपूरकडे अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात प्रस्थान झाले. गावातील प्रत्येक रस्ता विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. ज्ञानोबा-तुकोबा, माऊली... माऊली... या जयघोषात टाळ-मृदंगाचा निनाद, वारकऱ्यांचा उत्साह आणि भक्तीचा अविस्मरणीय संगम अनुभवायला मिळाला. पालखीभोवती दौडणाऱ्या अश्वाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले, तर वैष्णवांच्या मेळ्याने संपूर्ण बुरूडगाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. वारकऱ्यांना सर्वाधिक सुविधा उपलब्ध करून देणारी आणि शिस्तबद्ध नियोजनासाठी ओळखली जाणारी बुरूडगाव पायी दिंडी यंदाही विशेष आकर्षण ठरली. यावेळी किशोर कुलट, जालिंदर कुलट, अक्षय लगड, नवनाथ वाघ, जालिंदर वाघ, बापू औताडे, अशोक जाधव, अविनाश जाधव, बाळासाहेब रकटे, दिगंबर कार्डिले, भाऊसाहेब कुलट, बाळसाहेब जाधव, नवनाथ मोकाटे, फारुख शेख, विष्णुदास जाधव, पांडू जाधव, राधाकिसन कुलट, शिवाजी मोढवे, बाळासाहेब मोढवे, गोवर्धन कामीनसे, जनजीवन माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक-विद्यार्थी, आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, तलाठी, ग्रामसेवक तसेच बुरूडगाव आजी-माजी सैनिक संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

## बेकायदेशीर सावकाराविरोधात रिपाईचा एल्गार



**अहिल्यानगर :** बेकायदेशीर सावकारीच्या माध्यमातून मातंग समाजातील एका गरीब कुटुंबाची शेतजमीन फसवणूक करून बळकावल्याचा गंभीर आरोप करत शेंडी पोखर्डी येथील त्या सावकारावर महाराष्ट्र सावकारी अधिनियम तसेच अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा (ॲट्रॉसिटी क्ट) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली असून, अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलामअली शेख, विजय शिरसाठ, सुनील वाघमोडे, नामदेव उमाप, ताराबाई वाघमारे, वसंत उमाप, उत्तम उमाप, विजय पाटोळे, अरबाज शेख यांच्यासह पीडित उमाप कुटुंबीय उपस्थित होते. निवेदनानुसार, सन २०१६ मध्ये मौजे कोळपे आखाडा, नांदगाव येथील नामदेव मनोहर उमाप, उत्तम मनोहर उमाप, वसंत मनोहर उमाप आणि ताराबाई बबन वाघमारे यांच्या कुटुंबाची गट क्रमांक ११/१ मधील १ हेक्टर १४ आर शेतजमीन आर्थिक अडचणीमुळे शेंडी पोखर्डी येथील सावकाराकडे ३ टक्के व्याजदराने गहाण ठेवण्यात आली होती.

# उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी मातंग समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

### अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा लाभ वंचित घटकांना देण्याची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण तातडीने लागू करून लाभवंचित घटकांना न्याय द्यावा, या प्रमुख मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य महामोर्चा काढण्यात आला. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्य सरकारांना असल्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, निर्णयानंतरही महाराष्ट्र शासनाने अद्याप उपवर्गीकरणाची अंमलबजावणी न केल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी आहे.

मातंग समाजाला नोकरी, शिक्षण तसेच विविध शासकीय योजनांमध्ये अपेक्षित प्रतिनिधित्व मिळालेले नसल्याने सन १९८० पासून उपवर्गीकरणाची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. सन २०२२ पासून विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष आणि समाजातील मान्यवरांनी एकत्र येत 'सकल मातंग समाज महाराष्ट्र'च्या माध्यमातून हा लढा अधिक व्यापक केला आहे. या आंदोलनांतर्गत 'जवाब दो आंदोलन', 'दवंडी आंदोलन' आणि 'जनआक्रोश महाआंदोलन' यांसारखे विविध आंदोलनात्मक कार्यक्रम राबविण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महाराष्ट्र शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी निवृत्त न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समितीची स्थापना केली होती. समितीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून, विविध राज्यांमधील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेचा आढावा घेत आवश्यक माहिती व तथ्यांचे संकलन केले. त्यानंतर मार्च २०२६ मध्ये समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला.

## केंद्राने पोस्टल कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा संघर्ष अटळ : कॉम्रेड झगडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अखिल भारतीय आरएमएस व एमएमएस कर्मचारी संघटना (ग्रुप 'सी') व एनएफपीईच्या संयुक्त आवाहनानुसार पोस्टल कर्मचाऱ्यांच्या विविध न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी नुकतेच देशभर दुपारच्या सुट्टीत निदर्शने करण्यात आली. संघटनेचे जनरल सेक्रेटरी कॉ. प्रदीप खडसे यांच्या नेतृत्वाखाली देशभर आंदोलन पार पडले, तर महाराष्ट्रात सर्कल सचिव कॉ. अरविंद शिवतरे यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने आयोजित करण्यात आली होती.

महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, सोलापूर व लातूर या चार विभागांमध्ये विभागीय सचिव कॉ. अजित झगडे यांच्या नेतृत्वाखाली पोस्टल कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत जोरदार निदर्शने केली. या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष कॉ. उमाकांत वालगुडे, कॉ. राजू मगर,कॉ रवींद्र काशीद,कॉ. लक्ष्मण हुंबे, कॉ. राजेंद्र चव्हाण, कॉ. अशोक दळवे, कॉ. महादेव निंबाळ, कॉ. बाबासाहेब बोरुडे, कॉ. विठ्ठल आबनावे, कॉ. कैलास उंबरकर, कॉ. सचिन गाडेकर, कॉ. विक्रम परदेशी, कॉ. दत्ता व्हटे, कॉ. आयुब शेख, कॉ. तुषार टाक, कॉ. निलेश झांबरे, कॉ. महेश काळे, कॉ. श्रीकांत पाटील, कॉ. सागर काळभोर, कॉ. दिप्ती कंगे, कॉ. अश्विनी घोरपडे, कॉ. शानम कोरे आणि कॉ. सोमिनाथ गांजुरे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व पोस्टल कर्मचारी उपस्थित होते.

## देविभोयरे अंबिका देवस्थानला 'ब' वर्ग दर्जा : आ. दाते

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**पारनेर :** देविभोयरे येथील ग्रामदैवत अंबिका देवस्थान ट्रस्टला अखेर शासनाकडून 'ब' वर्ग दर्जा प्राप्त झाला असून, या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे देवस्थानाच्या विकासासाठी नवे पर्व सुरू झाले आहे. यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून शासनाची मंजुरी मिळवून दिली. या यशाबद्दल देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि भाविकांनी आमदार दाते सर यांचा जाहीर सत्कार करून मनःपूर्वक आभार व्यक्त केले.अंबिका देवस्थान हे देविभोयरेसह परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असून, अनेक वर्षांपासून या देवस्थानाला 'ब' वर्ग दर्जा मिळावा, अशी ग्रामस्थांची सातत्यपूर्ण मागणी होती. हा दर्जा मिळाल्यामुळे देवस्थानाच्या प्रशासनात अधिक सुसूत्रता येणार असून, विकासकामांना गती मिळणार आहे. तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याबरोबरच देवस्थानाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनविषयक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. यावेळी सत्काराला उत्तर देताना आ. काशिनाथ दाते म्हणाले की, देवस्थान ही केवळ पूजा-अर्चेची स्थळे नसून आपल्या संस्कृती, परंपरा आणि सामाजिक ऐक्याची केंद्रे आहेत. यावेळी शिवाजी जाधव, विकास सावंत, गणेश देवराम बेलोटे, विश्वनाथ गाजरे, बाबुराव मुळे, गोपीचंद बेलोटे, विजय बेलोटे, सुभाष बेलोटे, संपत वाळुंज, संतोष बेलोटे, दत्तात्रय बेलोटे, बाबुराव बेलोटे, ज्ञानदेव बेलोटे, शहाजी बेलोटे, जगन बेलोटे, रामदास बेलोटे, विश्वनाथ बेलोटे, भाऊसाहेब बेलोटे, अजिंक्य बेलोटे, अक्षय बेलोटे, संतोष केदारी, राहुल केदारी, सुनील आरोटे, भाऊसाहेब सरडे, अमोल गजरे, शरद बोरुडे, सिताराम आरोटे, बबन बेलोटे, साहेबराव गुंड, हर्षद झावरे, दिनेश गायकवाड, अतुल मुळे, प्रमोद मोरे, संजय बेलोटे, नारायण माळी, संपत तिकोणे, संतोष सरडे, अरविंद बेलोटे, कमलाकर बेलोटे, सत्यवान बेलोटे, दत्ता थोरात, सखाराम बेलोटे, रामकृष्ण दरेकर यांच्यासह देविभोयरे व परिसरातील भाविक, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बायजामाता दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान : पालखीचे सारथी बनले आ. कर्डिले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका :** नगर तालुक्यातील बायजामाता दिंडीचे गुरुवार (दि. १६) रोजी पंढरपूरकडे मोठ्या भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. टाळ-मृदुंगाचा गजर, ज्ञानोबा-तुकाराम आणि माऊलीच्या जयघोषाने संपूर्ण गाव दुमदुमून गेले. आकर्षक रांगोळ्या, शाळेतील विद्यार्थिनींचे लेझीम सादरीकरण, फटाक्यांची आतषबाजी आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

आमदार अक्षय कर्डिले यांनी स्वतः पालखीच्या बैलगाडीचे सारथ्य करत दिंडीत सहभाग नोंदविला. पालखीचा रथ हाकत त्यांनी वारकरी संप्रदायाविषयीची आपली श्रद्धा व्यक्त केली. यावेळी विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी प्रार्थना करत बळीराजाला सुगीचे दिवस येवोत, भरभरून पाऊस पडो, शेतकरी आणि सर्व वारकऱ्यांच्या मनोकामना पूर्ण होवोत, असे साकडे त्यांनी घातले.

बायजामाता दिंडी वै. बाळकृष्ण महाराज भोंदे तसेच प्रकाश शास्त्री ढेपे यांच्या आशीर्वादाने, मच्छिंद्र महाराज तवले, रघुनाथ महाराज तोडमल, भीमराज महाराज कुलट, धनंजय महाराज ससे, बेरड महाराज आणि रमेश महाराज चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे. पंचक्रोशीसह तालुक्यातील मोठ्या संख्येने वारकरी या दिंडीत सहभागी झाले आहेत.

दिंडीचे १७ वे वर्ष असून दिंडीची परंपरा स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते पालखी पूजनाने सुरू झाली होती. त्यानंतर प्रत्येक वर्षी ते दिंडीच्या प्रस्थानावेळी आवर्जून उपस्थित राहत असत. त्याच धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा वारसा आ. अक्षय कर्डिले यांनीही जपल्याचे यावेळी पाहावयास मिळाले. दिंडीतील वारकरी आणि आयोजकांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासनही आमदार कर्डिले यांनी दिले. यावेळी महिला, ग्रामस्थ आणि भाविकांची उपस्थिती होती.

## अरणगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नम्रता कांबळे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अरणगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नम्रता दिगूभाऊ कांबळे यांची निवड झाल्याने दरेवाडी गणातील राजकीय वातावरणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निवडीकडे राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण घडामोडी म्हणून पाहिले जात आहे.

दिगू कांबळे यांचे मोठे बंधू राहुल कांबळे (माया) यांची भूमिका या उपसरपंच निवडीमध्ये महत्त्वाची ठरली. राहुल कांबळे यांचा मित्र परिवार मोठा असून शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात त्यांचे कार्य सुरु आहे. अरणगाव ही मोठ्या लोकसंख्येची ग्रामपंचायत असून, उपसरपंचपदी झालेल्या या निवडीमुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांना चालना मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

गावातील सरपंच पोपट पुंड, उपसरपंच विठ्ठल दळवी, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे पदाधिकारी, विविध समाजघटकांतील मान्यवर तसेच युवकांच्या सहकार्याने गावाच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. उपसरपंच निवडीनंतर झालेल्या सत्कार सोहळ्यास प्रवीण चाबुकस्वार, दिलीप कांबळे, इकेश कांबळे, माजी उपसरपंच संपत कांबळे, मोहिनी जाधव, प्रतिभाताई थोरात, स्वाती शिंदे, नंदाताई करांडे, अंजुम सय्यद, मारुती आमले, तसेच मयूर जगताप, ईश्वर फसले, बापू शिंदे, अर्जुन पुंड, साहिल गायकवाड, किरण कांबळे, मंगेश भिंगारदिवे, ऋतिक कांबळे, सागर भांबळ, शंकर सूर्यवंशी, मेहेर राजू, योगेश कांबळे, सुमित माळवे, आदेश कांबळे, श्रीकांत रोहकले, शाक्य कांबळे, सुरज कांबळे, स्यामी देठे, सिमी कांबळे, समर्थ कांबळे, संग्राम कांबळे, सुदाम साळवे, राजू पवार, प्रेम गौतम कांबळे, सतीश जयदेव कांबळे, पियुष कांबळे, अश्विन कांबळे, संदेश साळवे, आकाश साळवे, किशोर शिंदे, शेखर साळवे, सागर जावळे, मेहेर कांबळे, वीर जाधव, संग्राम कांबळे, राज भिंगारदिवे, महेंद्र कांबळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वारकऱ्यांच्या गैरसोयीवरून शिवसेना आक्रमक

### लोडशेडिंग तात्काळ बंद करा, अन्यथा महावितरण कार्यालयावर धरणे आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी दिंड्यांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या लोडशेडिंगविरोधात शिवसेना आक्रमक झाली आहे. महावितरणचे अहिल्यानगर येथील अधीक्षक अभियंता सुभाष घाटोळ यांना निवेदन देत संध्याकाळी ७.३० ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरू असलेले लोडशेडिंग तात्काळ रद्द करावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अन्यथा महावितरणच्या कार्यालयात धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

शिवसेना नेते संदेश तुकाराम कार्ले, नगर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती रामदास भोर आणि रणजीत परदेशी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या पंढरपूरकडे हजारो वारकरी दिंड्या मार्गस्थ असून नगर सोलापूर महामार्ग, नगर दौण्ड महामार्गावर अनेक गावांमध्ये दररोज १० ते १२ दिंड्यांचा मुक्काम होत आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीतून जाण्यासाठी चार ते पाच दिवसांचा कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत संध्याकाळच्या वेळेत वीजपुरवठा खंडित केल्यामुळे वारकऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने साप, विंचू यांसारख्या विषारी प्राण्यांचा वावर वाढला आहे. रात्रीच्या अंधारात वीज नसल्याने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ वारकऱ्यांना अंधारामुळे मोठा त्रास सहन करावा लागत असून मुक्कामाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा विस्कळीत होत आहेत.

यावेळी सरकारच्या धोरणावरही निशाणा साधला. एकीकडे सरकार शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची वीजबिल माफी जाहीर करत आहे आणि दुसरीकडे राज्यात लोडशेडिंग सुरू केले जात आहे. ही विरोधाभासी भूमिका असून वारकऱ्यांना त्याची शिक्षा भोगावी लागत आहे

महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून वारकरी दिंड्यांच्या मार्गावरील लोडशेडिंग रद्द करावे, अशी मागणी करत मागणी मान्य न झाल्यास दुपारी ४ वाजता अधीक्षक अभियंत्यांच्या दालनासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शिवसेना नेत्यांनी दिला आहे.

# लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी नगरमध्ये मौन कॅण्डल मार्च

### सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा; नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी शांततामय व लोकशाही मार्गाने आंदोलन करणारे सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी तसेच केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, या मागणीसाठी अहिल्यानगरात आज शुक्रवारी (दि. १७ जुलै) मौन कॅण्डल मार्चचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील विविध सामाजिक संघटना आणि जागरूक नागरिकांच्या पुढाकारातून हा मार्च काढण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सायंकाळी ७ वाजता वाडिया पार्क येथील महात्मा गांधी स्मारकापासून या मौन कॅण्डल मार्चला सुरुवात होईल. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गाने मार्च निघून माळीवाडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे समारोप होणार आहे.




आयोजकांच्या निवेदनानुसार, हा मार्च लोकशाही मूल्ये, संविधान आणि शांततामय आंदोलनाच्या अधिकारावर विश्वास व्यक्त करणारा आहे. महात्मा गांधी यांनी सत्य व अहिंसेच्या मार्गाने अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य आणि समानतेचे अधिकार दिले. या दोन महामानवांच्या स्मारकांना जोडणारा हा मौन कॅण्डल मार्च म्हणजे लोकशाही मूल्यांना अभिवादन करण्याचा सामूहिक संकल्प असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आणि अन्यायाविरुद्ध आज समाजाने आवाज उठवला नाही, तर भविष्यात आपल्या प्रश्नांसाठीही कोणी उभे राहणार नाही. त्यामुळे युवक-युवती, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा मौन कॅण्डल मार्च यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या मार्चमध्ये सहभागी होण्याचे आवाहन ॲड. श्याम आसावा, स्नेहालय युवा निर्माण प्रकल्पाचे विकास सुतार, युवानचे संदीप कुसळकर, राजमुद्रा अकॅडमीच्या नंदाताई पांडुळे तसेच जागरूक नागरिक मंचाचे सुहास मुळे यांनी केले आहे.

# गणना अर्जांच्या डिजिटायझेशनमध्ये राजकीय पक्षांनी सक्रीय भूमिका घ्यावी : जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (डखठ) कार्यक्रमात प्रशासनाकडून सर्वतोपरी खबरदारी घेतली जात असून याद्या अचूक व परिपूर्ण तयार करण्यासाठी राजकीय पक्षांनीही सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले. विशेषतः गणना अर्जांच्या डिजिटायझेशनचा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असून या प्रक्रियेत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी प्रभावी योगदान द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राजकीय पक्षांच्या साप्ताहिक बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, तहसीलदार शीतल मुळे तसेच विविध राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, शहर प्रमुख, सचिव आणि प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. डूडी यांनी सांगितले की, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यास दोन सहाय्यक नियुक्त करण्यात आले असून जिल्ह्यात एकूण १२ हजार ६३१ सहाय्यक कार्यरत आहेत. आतापर्यंत ५५ टक्के मॅपिंगचे काम पूर्ण झाले असून ५३ टक्के गणना अर्जांचे वितरण करण्यात आले आहे.



ते पुढे म्हणाले, या संपूर्ण प्रक्रियेतील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा म्हणजे अर्जांचे डिजिटायझेशन जास्तीत जास्त मतदारांचे अर्ज वेळेत डिजिटाईज होण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी आठवड्यातून किमान एक दिवस बीएलओकडील याद्यांची पडताळणी करावी. पात्र मतदाराचे नाव कोणत्याही परिस्थितीत यादीतून वगळले जाणार नाही, यासाठी दक्षता घेणे आवश्यक आहे. ज्या मतदारांपर्यंत गणना अर्ज पोहोचणार नाही किंवा अर्ज जमा होणार नाही, त्यांचे नाव यादीतून वगळले जाण्याची शक्यता असल्याने प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून अर्ज भरून घेणे आणि ते डिजिटायझेशनसाठी उपलब्ध करून देण्यात राजकीय पक्षांनी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.शहरी भागात डिजिटायझेशनचे काम अधिक गतीने पूर्ण करण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी यापुढे राजकीय पक्षांची साप्ताहिक बैठक दर बुधवारीऐवजी दर सोमवारी दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात येईल, अशी माहिती दिली.उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघात डिजिटायझेशनच्या कामासाठी ४५० विद्यार्थी मदत करणार असल्याचे सांगितले. इतर मतदारसंघांतील विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# चप्पल विक्रेत्याची मुलगी बनली वैद्यकीय अधिकारी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरूर) येथील चप्पल विक्रेते असलेल्या संतोष सुरशे यांच्या मुलीने जिद्दीने अभ्यास करत वैद्यकीय अधिकारी पदाला गवसणी घातली असून डॉ. श्वेता संतोष सुरशे यांची महाराष्ट्र शासनाच्या शासकीय वैद्यकीय अधिकारी श्रेणी १ या पदावर निवड झाली आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पारंपारिक चप्पल व्यावसायिक असलेल्या संतोष सुराशे यांची मुलगी श्वेता हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, अभ्यासामध्ये जिद्द ठेवत आई वडील व शिक्षकांचे मार्गदर्शन घेऊन जिद्दीच्या जोरावर वैद्यकीय शिक्षण पूर्ण करत प्रकाश इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च, इस्लामपूर येथून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करत जे. जे. रुग्णालय मुंबई येथे इंटर्नशिप पूर्ण करुन डॉ. आर. एन. कूपर रुग्णालय, जुहू मुंबई येथे एम. डी. पदवी संपादन केली असून सध्या डॉ. श्वेता सुरशे या बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे येथे वरिष्ठ निवासी डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.



**शिक्रापूर येथील डॉ. श्वेता सुरशे यांनी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत झाल्यानंतर बोलताना ग्रामीण व गरजू रुग्णांना उत्तम दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हेच माझे मुख्य ध्येय असून शासनाने सोपविलेली जबाबदारी मी पूर्ण निष्ठा, प्रामाणिकपणा व सेवाभावाने पार पाडेन असे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्वेता सुरशे यांनी सांगितले.**

डॉ. श्वेता सुरशे यांनी अत्यंत मेहनत आणि जिद्दीच्या बळावर वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचविण्याचा त्यांचा दृढ संकल्प असून, स्पर्धात्मक निवड प्रक्रियेत यश मिळवत त्यांनी या मानाच्या पदाला गवसणी घातली असल्याने त्यांचे परिसरातून कौतुक होत आहे.

# दिंड्यांमधील वारकऱ्यांना पोलिसांचे संरक्षण कवच

## पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल खाकी वर्दीतील वारकरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यातील प्रत्येक मार्गावर अत्यंत भक्तीमय वातावरणात वारकऱ्यांच्या पायी दिंड्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे मार्गस्थ होत असताना आपल्याला दिसून येत आहेत.

पालखी सोहळ्यामुळे अनेक जिल्ह्यातून लाखो वारकरी विविध तालुक्यातून पंढरपूरच्या दिशेने विठ्ठलाच्या भेटी साठी असंख्य भाविक भक्त व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी येत असताना त्यांच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी पोलीस प्रशासनाची असल्यामुळे. कोल्हापूर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी दिंड्यां मधील वारकऱ्यांच्या संरक्षणार्थ प्रत्येक पोलीस स्टेशनला विशेष सूचना दिल्या असून त्यांनी एव्हढ्यावरच न थांबता ते स्वतःही प्रत्यक्ष महामार्गावर खाकी वर्दी तील वारकरी बनून या लाखो वारकऱ्यांना आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांसह कडक बंदोबस्तात संरक्षण देण्याचे काम करताना निदर्शनास आले आहे.याबाबत नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाबाबत समाधान देखील व्यक्त होत आहे.



पुणे जिल्ह्याच्या टोकावरील कल्याण-नगर महामार्गावरून पायी पालख्या जात असताना त्यातील वारकऱ्यांच्या संरक्षनासाठी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी पंढरपूरला जाणाऱ्या पायी पालखी सोहळ्यातील प्रत्येकाच्या संरक्षणार्थ खबरदारी घेण्याविषयी पुणे ग्रामीण हद्दीतील असणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना विशेष जबाबदारी दिली असून ते स्वतः देखील पुणे जिल्ह्याच्या हद्दी पर्यंत वारकऱ्यांच्या सेवेसाठी उन्हा पावसात रस्त्यावर उभे राहून संरक्षण देत असल्यामुळे पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना खाकी वर्दीतील वारकऱ्यांचे दर्शन झाले त्यामुळे दिंडीद्वारे सर्व पायी जाणारे वारकरी निर्धास्तपणे मनोमन सुखावल्याचे चित्र स्पष्ट झाले असून त्यांचा सन्मान देखील करण्यात आला आहे.

# 'झाडे लावा, झाडे जगवा'चा कृषी महाविद्यालयातून संदेश

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पर्यावरण संवर्धन आणि हरित क्षेत्रवाढीचा संदेश देत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय आणि उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे येथे 'फुले हरित अभियान २०२६' अंतर्गत मंगळवारी (ता. १४) फळझाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात केशर आंबा, फुले निळकंठ जांभूळ आणि कालीपत्ती चिक्कू या जातींच्या फळझाडांची लागवड करण्यात आली.




महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तथा सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्ष तुषार पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात झाली. या वेळी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विभागीय संचालक अजय शिंदे, ३६ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेनेचे लेफ्टनंट कर्नल हेमचंद्रा, विभागीय फळे संशोधन केंद्र, गणेशखिंडचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. डी. बी. लाड, एस. एस. प्रोजेक्ट कंपनीचे विठ्ठल कांबळे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून आणि अधिष्ठाता कृषी व संचालक शिक्षण डॉ. सात्ताप्पा खरबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या उपक्रमात महाविद्यालयातील प्रत्येक कर्मचारी व विद्यार्थ्याने किमान एक झाड दत्तक घेऊन त्याचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प केला. त्यामुळे पर्यावरण संरक्षण, जैवविविधता संवर्धन आणि शाश्वत विकासाला हातभार लागणार आहे.

## कर्मचारी, विद्यार्थ्यांनी घेतली संगोपनाची जबाबदारी



# उपमुख्यमंत्री पवार यांच्यावतीने वारंकऱ्यांना औषधाचे किट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र काटेवाडी मार्फत जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळा चे औचित्य साधून सहभागी वारकरी यांचा आवश्यक औषधाचे किट देऊन वारकरी यांचे आरोग्याची काळजी घेण्याची नाविण्यपूर्ण योजना राबविण्याचा संकल्प प्रा. आ. केंद्र काटेवाडीचे वैद्यकिय अधिकारी डॉ. वैशाली देवकात व डॉ. बापू दडस यांनी केला व या संकल्पास मा. उपमुख्यमंत्री श्रीम. सुनेत्राताई पवार यांनी सहमती दर्शविले व मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या शुभहस्ते वारकरी दिडी प्रमुखांना औषध किट चे वाटप केले. याप्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोज खोमणे, गटविकास अधिकारी. किशोर माने, तालुका विस्तार अधिकारी श्री. सूनिल जगताप काटेवाडीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते.

# पालखी सोहळ्यानंतर अवघ्या एका तासात बारामती स्वच्छ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने बारामती नगरपरिषदेने यंदा स्वच्छता, नियोजन आणि व्यवस्थापनाचा नवा आदर्श निर्माण केला. पालखी सोहळ्यापूर्वी शहरातील प्रमुख रस्ते, दिंडी मुक्कामस्थळे, सार्वजनिक ठिकाणे आणि पालखी मार्गावरील संपूर्ण परिसराची विशेष स्वच्छता करण्यात आली होती. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच नगराध्यक्ष सचिन सातव यांच्या नेतृत्वाखाली लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदवला.

पालखी शहरात दाखल झाल्यानंतर तसेच शारदा प्रांगण येथे मुक्कामी आल्यानंतर नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्ष, आरोग्य सभापती नवनाथ बल्लाळ, नगरसेवक, मुख्याधिकारी पंकज भुसे आणि अधिकारी वर्ग यांनी गांधी चौक ते गुणवडी चौक या परिसरात प्रत्यक्ष स्वच्छता कामात सहभाग घेतला. त्यांच्या या कृतीमुळे सफाई कर्मचारी आणि अधिकारी यांना मोठे प्रोत्साहन मिळाले आणि संपूर्ण यंत्रणा अधिक जोमाने कामाला लागली.

**स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विकास व लोकसेवेच्या परंपरेला साजेसा पालखी सोहळा यंदा पार पडला. मा. सुनेत्रा वहिनी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेने अभूतपूर्व स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण शहर स्वच्छ व सुंदर ठेवले.**

**– सचिन सातव**
नगराध्यक्ष, बारामती नगरपरिषद.

पालखी मुक्कामासाठी शारदा प्रांगणात पोहोचल्यानंतर नागवडे वस्ती-देशमुख चौक-शारदा प्रांगण हा संपूर्ण पालखी मार्ग अवघ्या एका तासाच्या आत स्वच्छ करण्यात आला. तसेच आज सकाळी पालखीच्या प्रस्थानानंतर शहरातील मुख्य रस्ते, मैदान परिसर, मुक्कामस्थळे आणि पालखी मार्गावरील सर्व भाग पुन्हा केवळ एका तासाच्या आत स्वच्छ करून शहर पूर्ववत करण्यात आले. या कामासाठी नगरपरिषदेचे सुमारे ४५० सफाई मित्र, १८ मुकादम, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी अहोरात्र कार्यरत होते. त्यांच्या अथक परिश्रमामुळे पालखी सोहळ्यादरम्यान आणि त्यानंतरही बारामती शहर स्वच्छ, सुंदर आणि सुस्थितीत ठेवण्यात यश आले.

**बारामती नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने काम करत पालखी आगमन आणि प्रस्थानानंतर संपूर्ण शहराची स्वच्छता व सुव्यवस्था अबाधित राखली.**

**– पंकज भुसे**
मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद

बारामती शहरातून पालखीचे आगमन आणि प्रस्थान या दोन्ही टप्प्यांमध्ये नगरपरिषदेने केलेले नियोजन, स्वच्छता आणि व्यवस्थापन यामुळे वारकरी, भाविक आणि नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. बारामतीच्या स्वच्छता आणि व्यवस्थापनाच्या परंपरेला साजेसे काम यंदाही नगरपरिषदेने करून दाखवले आहे.




**बारामतीच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या मोलाच्या योगदानामुळे पालखी सोहळ्यापूर्वी आणि त्यानंतर विक्रमी वेळेत संपूर्ण शहराची स्वच्छता पूर्ण करता आली.**

**– नवनाथ बल्लाळ**
आरोग्य सभापती, बारामती नगरपरिषद.

## पुणे विभागात खरीप पेरण्यांना वेग

# पावसाची उघडीप अनुकूल; पुढील पंधरवड्यात बहुतांश पेरण्या पूर्ण होण्याची शक्यता

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** गेल्या काही दिवसांतील दमदार पावसानंतर पुणे विभागात पावसाने उघडीप दिल्याने खरीप पेरण्यांना वेग आला आहे. पुणे विभागातील सरासरी १२ लाख ५६ हजार ४३९ हेक्टर खरीप क्षेत्रापैकी ४ लाख १६ हजार ५९६ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली असून, हे एकूण क्षेत्राच्या ३३ टक्के आहे. हवामान अनुकूल राहिल्यास पुढील पंधरवड्यात बहुतांश पेरण्या पूर्ण होतील, अशी माहिती कृषी विभागाने दिली.

**पीक पेरणी विभागातील जिल्हानिहाय पीक पेरणीचे क्षेत्र (हेक्टरमध्ये)**

| जिल्हा | सरासरी | पेरलेले क्षेत्र | टक्के |
|---|---|---|---|
| अहिल्यानगर | ७१६२०१ | ३११५२५ | ४३ |
| पुणे | २०२२६३ | ३२१२१ | १६ |
| सोलापूर | ३३७९६७ | ७२९५० | २२ |
| एकूण | १२५६४३९ | ४१६५९६ | ३३ |

अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाची उघडीप मिळाल्याने पेरण्यांना गती आली आहे. अकोले तालुक्यात भाताची पुनर्लागवड सुरू असून बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, भुईमूग, सोयाबीन आणि कापूस ही पिके उगवणीच्या अवस्थेत आहेत. अकोले तालुक्यात १,२१०.५९ हेक्टर क्षेत्रावर भात रोपवाटिका तयार करण्यात आल्या आहेत.



पुणे जिल्ह्यातही खरीप पेरण्या वेगाने सुरू असून भाताची पुनर्लागवड सुरू झाली आहे. बाजरी, मका, मूग, भुईमूग आणि नाचणीची पेरणी झालेली असून पिके उगवणीच्या अवस्थेत आहेत. सोयाबीनची पेरणीही सुरू झाली आहे.सोलापूर जिल्ह्यात बाजरीचे पीक उगवणीच्या अवस्थेत असून त्याची स्थिती चांगली आहे. मका उगवण ते रोप अवस्थेत, तर मूग व उडीद रोप अवस्थेत आहेत. तूर उगवणीच्या अवस्थेत असून सोयाबीन उगवण ते रोप अवस्थेत आहे. बहुतांश पिकांची स्थिती समाधानकारक असल्याचे कृषी विभागाने नमूद केले.

## दखल

### तळेगाव ढमढेरेत किराणा दुकानदार महिलेला मारहाण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथे एका किराणा दुकानात आपापसात वादावादी करणाऱ्या युवकांना बाहेर जाण्यास सांगितल्याने सदर युवकांनी दुकानदार महिलेला मारहाण केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अर्जुन शिर्के सह दोन युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील विशाल विश्व सोसायटी समोर असलेल्या विशाल सुपर मार्केट दुकान चालक जसाराम चौधरी हे दुकानात असताना अर्जुन शिर्के सह दोन युवक दुकानात आले, ते एकामेकांशी वादावादी करत असताना जसाराम यांनी त्याना बाहेर जाण्यास सांगितल्याने तिघांनी जसाराम यांना पकडून दमदाटी करु लागले, दरम्यान जसाराम यांच्या पत्नीने सदर युवकांना बाजूना ढकलून दिल्याने तिघांनी महिलेच्या अंगावर नारळाचा ट्रे फेकून मारून दमदाटी केली, यावेळी महिला मोबाईलमध्ये शुटींग काढत असताना अर्जुन याने मोबाईलवर नारळ फेकून मारला, सदर घटनेत भवरी जसाराम चौधरी (वय ४५ वर्षे रा. विशाल विश्व सोसायटी तळेगाव ढमढेरे ता. शिरुर जि. पुणे) हि महिला जखमी झाली असून याबाबत सदर महिलेने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अर्जुन शिर्के, संदीप यांसह एक अनोळखी युवक ( पूर्ण नाव पत्ता माहित नाही ) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार संदीप इथापे हे करत आहे.

### शिक्रापुरात टेम्पो चालकाकडून कार चालकाला मारहाण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील चाकण चौक येथे पुणे नगर महामार्गावर कारला कट मारल्याच्या वादातून कार चालकाला मारहाण करण्यात आल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे दोन अज्ञात युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) येथील चाकण चौक येथून संतोष शिंदे हे त्यांच्या ताब्यातील एम एच १२ एक्स एम ५६९६ हि कार घेऊन पुणे बाजूने अहिल्यानगरच्या दिशेने चाललेले असताना पाठीमागून आलेल्या एम एच १२ क्यू जि २८६२ या छोटा टेम्पोने शिंदे यांच्या कारला कट मारून पुढे थांबवले, त्यांनतर टेम्पो मधील दोघांनी खाली उतरुन संतोष शिंदे यांना तू आमच्या टेम्पोला कट मारला, आमचा टेम्पो दाबला असे म्हणू दगडाने मारहाण करत जखमी केले, याबाबत संतोष पांडुरंग शिंदे (वय ४५ वर्षे रा. भोकराई नगर हडपसर पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी एम एच १२ क्यू जि २८६२ या छोटा टेम्पो मधील दोघा अज्ञात युवकांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार बापू हाडगळे हे करत आहे.

### शिरुर एसटी स्थानकात महिलेचा विनयभंग

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिरुर शहरातील एस टी स्थानक मध्ये आलेल्या एस टी मध्ये महिलेचा विनयभंग केल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे अशोक बाबू लहाणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शिरुर शहरातील एस टी स्थानक मध्ये आलेल्या एम एच ४० वाय ५७९५ या एस टी मधून महिला आलेली असताना एस टी मधील पाठीमागील शीटवर झोपलेल्या इसमाला सदर महिलेने उठण्यास सांगितले असता झोपलेल्या अशोक लहाणे याने महिलेला अश्लील भाषेत शिवीगाळ, दमदाटी करत महिलेचा हात पकडून मारहाण करत महिलेच्या मनास लज्जा निर्माण होईल असे वर्तन केले, घडलेल्या प्रकाराबाबत पिडीत महिलेने शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अशोक बाबू लहाणे (वय ३१ वर्षे रा. पाईपलाईन रोड सावेडी ता. अहिल्यानगर जि. अहिल्यानगर) याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार नाथासाहेब जगताप हे करत आहे.

## द • ख • ल

### चिचोंडी येथे 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'तर्फे शालेय साहित्य वाटप




**शिराळ चिचोंडी :** लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आणि लार्सन अँड टुब्रो यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री आनंद विद्यालय (चिचोंडी) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत शालेय साहित्य वाटप कार्यक्रम आणि पालक मेळावा उत्साहात पार पडला. संस्थेच्या संस्थापिका डॉ. विली मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या आठ वर्षांपासून अहिल्यानगर जिल्ह्यातील १० शाळांमध्ये शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना गणित, इंग्रजी व विज्ञान विषयांचे मोफत मार्गदर्शन करण्यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे. यावेळी विद्यार्थी आणि पालकांनी संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सांभाळले. इंग्रजी शिक्षिका डमाळे मॅडम यांनी आभार मानले. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टतर्फे वर्षभर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी कार्यशाळा, करिअर मार्गदर्शन आणि पालक प्रशिक्षण यांसारखे विविध उपक्रम राबवले जातात, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

### श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी रथ पंढरीत दाखल




**कर्जत :** श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी रथाचे धाकटी पंढरी कर्जत शहरात मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पालखी रथाचे प्रमुख हभप मोहन महाराज बेलापुरकर यांच्यासह सेवेकरी, मानकरी - पुजेकरी यांचा सन्मान कर्जतचे ग्रामदैवत श्री संत शिरोमणी सदगुरु गोदड महाराज यात्रा कमिटी, तालुका प्रशासन आणि सर्वपक्षीय राजकीय पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. ज्ञानोबा- माऊली- तुकाराम आणि जय हरीच्या जयघोषणेने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. शहरात ठिकठिकाणी संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी रथाचे दर्शन भाविकांनी घेतले. विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे, बारामती ऍग्रोचे राजेंद्र पवार यांनी पालखीचे स्वागत केले. या काळात पोलीस प्रशासनाने चोख व्यवस्था राखत वाहतुकीचे नियंत्रण करीत वारकरी-भाविकांना पालखीस्थळी पोहच करण्यात महत्वाची भूमिका निभावली. तर वारकऱ्याची आरोग्य सेवा राखण्यात विविध ठिकाणी वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली होती. यासह कर्जत नगरपंचायतीच्यावतीने पालखी मुक्काम ठिकाणी तसेच वारकऱ्यांची निवास ठिकाणी फिरते शौचालय, पाण्याची तजवीज करण्यात आली होती.

### आबासाहेब काकडे जयंतीनिमित्त निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये क्रिकेटची रणधुमाळी



**शेवगाव :** आबासाहेब काकडे यांच्या जयंतीनिमित्त निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये भव्य क्रिकेट स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शेवगाव सायकल असोसिएशनचे अध्यक्ष विनोद ठाणगे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, प्राथमिक विद्यामंदिरच्या प्राचार्या सौ. परवीन पटेल, शाळेचे सहसमन्वयक श्री. ज्ञानेश्वर लबडे आणि प्राचार्य श्री. दत्तात्रय मोरे प्रमुख उपस्थित होते. स्पर्धेच्या समारोपावेळी काकडे विद्यालयाचे उपप्राचार्य मगर सर आणि क्रीडाशिक्षक कल्पेश भागवत यांच्या हस्ते विजेत्या संघांना आकर्षक ट्रॉफी व पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळू निळ यांनी तर संपूर्ण स्पर्धेचे प्रभावी समालोचन अमोल पवार व रूपाली शेटे यांनी केले.

### सर्वज्ञान शाळेतच अवगत : कवी डॉ. बळीद



**शेवगाव :** सर्व ज्ञान शाळेतच अवगत आहे फक्त घेणारा विद्यार्थी पारंगत हवा.कर्मयोगी आबासाहेब काकडे यांचे कार्य कधीही भंग न पावणारे आहे.असे प्रतिपादन कवी साहित्यिक डॉ.गवजी बळीद यांनी केले. चापडगाव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ वा जयंती पंधरवडा सांगता समारंभ व गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानाहूत ते बोलत होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्यध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, त्रिंबक काटे, अण्णासाहेब गोरे, सत्तारभाई शेख, शंकरराव जाधव, अंकुशराव कातकडे, शितलकुमार गोरे, दादासाहेब ज्योतीक आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ . बळीद पुढे म्हणाले की, आबासाहेबांनी ज्ञानाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवली. त्या काळात वसतीगृहे नसती तर माझ्यासारखे हजारो गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिले असते.विद्यार्थी परिपूर्ण होण्यासाठी विविध उपक्रम राबवणारी एकमेव विद्यालय हे आहे . प्राचार्य संपत दसपुते यांनी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त विद्यालयाच्या परीसरात १०७ जांभळीचे झाडे लावणार आहे असा मानस व्यक्त केला. प्रातिनिधीक स्वरूपात पाच झाडे मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात लावण्यात आली.ज्येष्ठ शिक्षक प्रभाकर मराठे यांनीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.विद्यालयात संपन्न झालेल्या वाचन, वकृत्व,मेहंदी, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर स्पर्धेमध्ये गुणवान विद्यार्थ्यांचा मान्यवराच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.

# दुध भेसळीचा महाघोटाळा?

## अन्नसुरक्षा विभागाच्या धडक कारवाईने लाखो लिटर दूध संकलनात घट

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** राज्यात अन्नसुरक्षा विभागाच्या धडक कारवाईनंतर जिल्ह्यासह श्रीगोंदा तालुक्यातील दूध व्यवसायात मोठी खळबळ उडाली असून, लाखो लिटर दूध संकलनात झालेली अचानक घट अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरली आहे. या घडामोडीनंतर इतके दिवस नेमके काय सुरू होते, भेसळयुक्त दूध कुठून येत होते आणि त्यामागे कोणाचे जाळे कार्यरत होते, याचा सर्वंकष तपास करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**जनतेच्या मनातील प्रश्न**

- लाखो लिटर दूध संकलन अचानक कसे घटले?
- इतके दिवस भेसळयुक्त दूध बाजारात कोण आणत होते?
- या संपूर्ण रॅकेटमध्ये नेमके कोण-कोण सहभागी आहे?
- नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल होणार का?
- अन्नसुरक्षा विभागाची धडक मोहीम जिल्हाभर कायम राहणार का?

कारवाईनंतर तालुक्यातील दूध संकलनात झालेली घट ही केवळ योगायोग आहे की भेसळीच्या साखळीचा परिणाम, याचा तपास होणे आवश्यक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. जर भेसळीमुळेच संकलन घटले असेल, तर नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कायद्याचा कठोर बडगा दाखविण्याची वेळ आली आहे, असे मत व्यक्त होत आहे.किरकोळ नफ्यासाठी दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की, हेच दूध त्यांच्या स्वतः च्या घरातील लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्या ताटात पोहोचू शकते. पैशाच्या हव्यासापोटी समाजाच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही दया न दाखवता कठोर शिक्षा व्हावी, अशी जनतेची मागणी आहे. अन्नसुरक्षा विभागाने सुरू केलेली धडक मोहीम जिल्हाभर सातत्याने राबवून संपूर्ण भेसळ रॅकेट उघडकीस आणावे, तसेच दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**ठळक ओळ**

दुधात भेसळ म्हणजे केवळ आर्थिक गुन्हा नाही; तो जनतेच्या आरोग्यावरचा थेट हल्ला आहे. दोषींना कठोर शिक्षा झाल्याशिवाय अशा प्रवृत्ती थांबणार नाहीत.

**'दूध माफिया'च्या शोधाची मागणी**



## ना. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शेवगाव-पाथर्डी टंचाई आढावा बैठक संपन्न

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना, ताजनापूर टप्पा क्रमांक १ योजनेसाठी २५० कोटी रुपयांचा निधी तसेच बंधारे व तलावांच्या दुरुस्तीसाठी सुमारे साडेसहा कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. अमरापूर येथील श्री लॉन्स येथे आयोजित शेवगाव-पाथर्डी तालुक्याच्या टंचाई आढावा व समन्वय बैठकीत ते बोलत होते.

बैठकीत शेवगाव शहर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या तसेच प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर दोन्ही तालुक्यांमध्ये टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा अधिक प्रभावी, पारदर्शक व नियोजनबद्ध पद्धतीने करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले.

यावेळी आमदार मोनिकाताई राजळे यांनी शेवगाव-पाथर्डी हा कायमस्वरूपी दुष्काळी भाग असल्याने राज्यातील नदीजोड प्रकल्पामध्ये या भागासाठी स्वतंत्र पाणी आरक्षित ठेवण्याची मागणी केली. मागील वर्षीच्या अतिवृष्टीत नुकसान झालेल्या साठवण बंधारे व तलावांच्या दुरुस्तीसाठी साडेसहा कोटी रुपयांचा निधी, ताजनापूर उपसा सिंचन योजना क्रमांक १ व २ साठी निधी, मुळा पाटबंधारे योजनेचे पाणी शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी कालव्यांची दुरुस्ती तसेच पावसाळा लांबल्यास आवश्यक त्या गावांमध्ये तातडीने टँकर उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

### तहसीलदारांचे उपोषण मागे घेण्याचे आवाहन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** भटके विमुक्त व आदिवासी समाजाच्या प्रलंबित जात प्रमाणपत्र प्रकरणांसंदर्भात श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या लाहानग्याच्या आमरण उपोषणाची प्रशासनाने अखेर दखल घेतली आहे. वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ऍड अरुण जाधव यांच्या लोकधिकार आंदोलन संघटनेच्या माध्यमातून भटके विमुक्त व आदिवासी समाजाच्या प्रलंबित जात प्रमाणपत्र प्रकरणांसंदर्भात श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या लाहानग्याच्या आमरण उपोषणाला तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी लोकअधिकार आंदोलन संघटनेला लेखी पत्र देत २३ जुलै २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा-पारनेर यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती दिली आहे. तहसील कार्यालयाकडून देण्यात आलेल्या पत्रानुसार, १५ जुलैपासून सुरू असलेल्या उपोषणाबाबत १६ जुलै रोजी दुपारी उपविभागीय अधिकारी यांच्या उपस्थितीत चर्चा झाली.

## श्री जगदंबा देवी मंदिर देवस्थान शेतजमिनीत बेकायदेशीर मुरूम उत्खनन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** श्री जगदंबा देवस्थानच्या मालकीच्या गट नंबर.१४५८/१ मधील जागेतून तब्बल २०० ब्रास मुरुमची बेकायदेशीर पने चोरी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून मंदिर प्रशासन व महसूल मुरूम तस्करांन वर काय कारवाई करतय या कडे ग्रामस्थ स्थानिकांमध्ये रंगत दार चर्चा रंगली आहे.. महसूल विभागाचा पंचनामा .. ग्रामस्थ स्थानिकांमध्ये संशय. या खळबळजनक प्रकारानंतर महसूल विभागाने दिनांक ०९/०७/२०२६ रोजी श्री जगदंबा देवस्थानच्या शेत जमीन ठिकाणी जाऊन महसूल कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी यांनी घटना स्थळाचा पंचनामा करून १००ते १५० ब्रास मुरूम चोरी झाल्याचे दर्शविण्यात आले आहे ..परंतु प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती पाहता नागरिकांमध्ये आचार्य व्यक्त केले जात आहे.. मंदिर प्रशासन व महसूल प्रशासनाच्या हातावर तुरी देऊन बेरात्री मुरूम चोरी मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे मुरुम तस्करांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांमधून मोठ्या प्रमाणावर जोर धरू लागली आहे.. देवस्थानच्या हक्काच्या जागेवर जागेवर राजरोस पने पडणाऱ्या दरोड्यामुळे आणि प्रशासनाच्या समस्यास्पद भूमिकेमुळे मुरूम चोरी करणाऱ्या मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन मुरूम चोरी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी आणि दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी अशी मागणी आता नागरिकांमधून जोर धरू लागले आहे यावर आता वरिष्ठ प्रशासन काय पावले उचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





### 'आरंभ फौंडेशन'कडून वारकऱ्यांची सेवा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** विठू माऊलीच्या दर्शनाची आस लागलेले हजारो वारकरी, टाळ-मृदंगाचा गजर आणि 'ज्ञानोबा-तुकाराम', 'संत वामनभाऊ महाराज की जय' अशा जयघोषाने अवघा शहर भक्तीमय झाले होते . श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती ह.भ.प. विठ्ठल महाराज यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या दिंडीचे जामखेड शहरात उत्साहात आगमन झाले. यामध्ये प्रामुख्याने बापुसाहेब कार्ले, पत्रकार ओंकार दळवी, डॉ. प्रकाश खंडागळे ,पत्रकार समिर शेख, चेतन राळेभात, वेंदात दळवी, अमोल अंधाळे, अमर चाऊस, भुजंग दळवी, चिन्मय राजगुरू, संजय फुटाणे, पांडुरंग कोल्हे, किरण भोरे, पोपट कार्ले, ऋषीकेश ठाकरे, प्रनय पाल, अथर्व औचरे, भरत आटोळे, संजय मोरे. सोमनाथ खवळे, शंकर डाडर, बाबू आंधळे फौंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कर्जत-जामखेडमध्ये एसआयआरचे ५० टक्के काम पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** कर्जत-जामखेड मतदारसंघात बीएलओ यांच्यामार्फ़त मतदार याद्याचे विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम युद्धपातळीवर असून आजतागायत ५० टक्के काम पूर्ण झाले असून ज्या मतदारांनी अजून देखील आपले इन्यूमरेशन फॉर्म भरले नाही किंवा त्यांच्याकडे नियुक्त केलेले बीएलओ आलेच नाही त्यांनी तात्काळ संबंधित नियुक्त बीएलओशी संपर्क करीत आपले फार्म भरून घ्यावे. असे आवाहन प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार तसेच जिल्हाधिकारी अहिल्यानगर डॉ पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली २२७ कर्जत-जामखेड मतदारसंघात मतदार याद्याचे विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर) राबविण्यात आला आहे. या कार्यक्रम अंतर्गत मतदारयाद्या अचूक बनवत त्यात पात्र नागरिकांची नावे समाविष्ट करणे यासह दुबार नावे, मयत मतदार तसेच स्थलांतरीत मतदारांची नावे वगळण्याची मोहीम सुरू आहे. यासाठी बीएलओ, सहायक बीएलओ, पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली असून कर्जत-जामखेड मतदारसंघात आजमितीस सरासरी ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. कर्जत-जामखेड मतदारसंघात एकूण ३ लाख ५० हजार ५२४ मतदार असून यातील ३ लाख ४१ हजार ७५१ मतदारांना इन्यूमरेशन फॉर्म (एसआयआर) वितरीत करण्यात आले आहे. यापैकी तब्बल १ लाख ७७ हजार ८५४ मतदारांचे इन्यूमरेशन फॉर्म (एसआयआर) नियुक्त बीएलओनी भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत पटलावर यशस्वीपणे भरले आहेत. तर उर्वरीत १ लाख ७० ५१० मतदार इन्यूमरेशन फॉर्म (एसआयआर) भरण्याचे बाकी असून ज्या मतदारांनी आपले फॉर्म भरलेच नाही किंवा त्यांच्याकडे नियुक्त केले बीएलओ आलेच नाही त्यांनी गावचे तलाठी, मंडळ अधिकारी यांच्याशी संपर्क साधत नियुक्त बीएलओचा संपर्क क्रमांक घेत आपला इन्यूमरेशन फॉर्म (एसआयआर) भरण्यास सहकार्य करावे असे आवाहन प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले आहे.

## मतदार यादीची पुर्ननिरिक्षण मोहीम महत्वाची : ना. विखे पाटील

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**पाथर्डी :** शेवगाव विधानसभा मतदार संघातील मतदार यादी सखोल पुनरिक्षण मोहीमेचा आढावा मंत्री विखे पाटील यांनी जाणून घेतला.आ.मोनिका राजळे भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग विनायक देशमुख यांच्यासह या मोहीमेसाठी नियुक्त करण्यात आलेले पक्षाचे प्रतिनिधी कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी केले.

आतापर्यंत मतदार संघात १लाखम७१ हजार अर्जाचे वितरण झाले आहे.आता अर्ज भरून घेण्याच्या कामाला गती द्यावी लागेल.सरकारी यंत्रणेच्या एक पाउल पुढे जावून संघटनात्मक स्तरावर अधिक काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. संपूर्ण देशातील २२राज्यात ही मोहीम सुरू असल्याचे नमूद करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,या मोहीमेमुळे कोणत्याही मतदारावर अन्याय होणार नाही.दुबार मतदार आणि मतदार यादीत खोटी माहीती देवून नाव टाकलेल्या व्यक्तीची नाव कमी करण्याची संधी आहे. पश्चिम बंगाल मध्ये मोहीम राबविल्यामुळे मतदार यादीतील घुसखोर उघडे पडले. निवडणूक प्रक्रीयेत गुंडगिरी दहशत करून अराजक निर्माण करण्याचे काम वर्षानुवर्ष सुरू होते.याद्यांचे पुर्नरिक्षण झाल्यामुळे ९१लाख मतदारांची नाव कमी झाल्याचे त्यांनी सांगितले. मतदार यादीत २००२ पासून नावाचा समावेश असणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवरील आपल्या गावात प्रभागात आणि बुथवर लक्ष केंद्रीत करून ही प्रक्रीया यशस्वी करण्याची जबाबदारी पदाधिकारी कार्यकर्ते आणि बुथ स्तरावर काम करणार्या प्रत्येकाची असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. मतदार सखोल पुनरिक्षण मोहीमेचा फायदा तुम्हाला भविष्यात दिसेल.कारण ही मोहीम परत कधी होईल माहीत नाही त्यामुळे आताच गांभीर्यपुर्वक मोहीमेत योगदान देण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले.

# सोलर कंपनीविरुद्ध जोहारवाडी ग्रामस्थांच्या तक्रारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** जोहरवाडी ता. पाथर्डी येथे नव्याने होत असलेल्या राजलक्ष्मी सोलर कंपनीकडून कामे करताना जोहारवाडी ग्रामस्थांना विनाकारण त्रास दिला जात असुन या कामी जिल्हाधिकार्यांनी लक्ष घालण्याची मागणी जोहारवाडी ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबत सविस्तर असे की जोहरवाडी ता. पाथर्डी येथे राजलक्ष्मी सोलर ही कंपनी सुमारे १४ एकर जमीनीवर ४ मेगावॅट वीज तयार करणार आहे.ही तयार केलेली वीज वहन करून भोसे येथील सब स्टेशनला जोडणार आहे. मात्र हे करत असताना संबंधित सोलर कंपनीचे कर्मचारी ग्रामस्थांच्या घरावरूनच तारा नेत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्या अनुषंगाने त्यांनी खांबही रोवण्यास सुरुवात केली आहे. या खांब रोवण्यास ग्रामस्थांनी विरोध केला असून आमच्या घरावरून तारा न्यायच्या नाहीत. त्या बाजूने न्याव्यात किंवा तेवढ्या टप्प्यात जमिनी खालून तारा घेऊन जाव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधीत सोलर कंपनीने सोलर स्टेशन ते भोसे सब स्टेशन या दरम्यान रस्त्याच्या दोन्हीही बाजूने वीज वहन करण्यासाठी अनेक खांब उभे केले आहेत मात्र हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणतीही परवानगी न घेताच उभे केले आहेत.रस्त्याच्या मध्यापासून किमान सात मीटर बाजुला पोल उभे करणे गरजेचे असताना सोलर कंपनीने तीन ते साडेतीन मीटर वरच हे खांब उभे केले असल्याने वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. कंपनीला समजावण्याचा प्रयत्न केला असता संबंधित कंपनीचे अधिकारी, कर्मचारी हे ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना दमदाटी करतात व अरेरावीची भाषा बोलतात. त्यामुळे याबाबत जिल्हाधिकारींनी या कामी लक्ष घालावे अशी मागणी जोहारवाडी चे माजी सरपंच कविता मच्छिंद्र सावंत, अण्णासाहेब फुलारे, सुरेश सावंत, अण्णासाहेब वांडेकर, हरिभाऊ वांढेकर, अशोक वांढेकर, संदीप शिंदे, आणि संतोष वांडेकर आदि ग्रामस्थांनी केली आहे.

> जोहारवाडी ग्रामस्थांच्या काही तक्रारी असल्यास त्याबाबत निश्चितपणे सोलर कंपनीस पत्राद्वारे कळवुन त्याचे निराकरण करण्यात येईल.
>
> **अरविंद कुकडे (उपकार्यकारी अभियंता महावितरण)**



दैनिक राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.१७ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८




# करजगाव उपोषण प्रकरणाला अखेर सकारात्मक वळण

## प्रशासनाच्या मध्यस्थीने दिव्यांग शेतकऱ्यांचे उपोषण अखेर ११ व्या दिवशी मागे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा / सोनई** : नेवासा तालुक्यातील करजगाव येथे रस्ता विकासाच्या कामावरून सुरू असलेल्या दिव्यांग शेतकरी व सुनेने सुरू केलेले आमरण उपोषणाला अखेर सकारात्मक वळण मिळाले आहे. प्रशासनाच्या मध्यस्थीने झालेल्या चर्चेनंतर तसेच जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नेवासा यांनी लेखी स्वरूपात भूमिका स्पष्ट केल्यानंतर अखेर ११व्या दिवशी करजगाव येथील दिव्यांग शेतकरी देवराव खंडू देवखिळे व त्यांच्या सून प्रतीक्षा मनेष देवखिळे यांनी उपोषण अखेर मागे घेतले. १३६गट क्रमांक मधील वादग्रस्त जमिनीची मोजणी करून त्यानंतरच रस्त्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, असे प्रशासने स्पष्ट आश्वासन दिले.यावेळी घोडेगावच्या तहसीलदार सोनाली मात्रे, गटविकास अधिकारी डॉ. संजय लखवाल, बांधकाम विभागाचे अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नेवासा यांनी दि. १६ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रात करजगाव येथील नागरी सुविधा योजनें अंतर्गत जुन्या वहिवाटीच्या रस्त्याचे काम मंजूर आराखड्यानुसार सुरू करण्यात आल्याचे नमूद केले आहे. मात्र, गट क्रमांक १३६ मधील जमिनीच्या हद्दीबाबत वाद निर्माण झाल्याने त्या वादग्रस्त भागातील रस्त्याचे काम तात्काळ थांबविण्यात आले असून, त्या ठिकाणी कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. वादग्रस्त भाग वगळून उर्वरित मंजूर काम पूर्ण करण्यात आल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने संबंधितांना यापूर्वीच महसूल विभागामार्फत अधिकृत जमिनीची मोजणी करून हद्द निश्चित करण्याचा सल्ला दिला होता. मोजणीनंतर महसूल अभिलेख, प्रत्यक्ष परिस्थिती आणि कायदेशीर बाबींचा विचार करूनच रस्त्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केली आहे. गट विकास अधिकारी यांनीही चर्चेदरम्यान गट क्रमांक १३६ मधील वादग्रस्त जागेत कोणतेही रस्त्याचे काम करण्यात आले नसल्याचे सांगितले. तसेच, अधिकृत परवानगीशिवाय त्या ठिकाणी रस्ता करण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

दरम्यान, प्रशासनाने उपोषणकर्त्यांना आत्मदहनासारखे टोकाचे आंदोलन न करण्याचे आवाहन केले होते. अशा आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, त्यामुळे प्रशासनाला सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली होती. या संदर्भातील पत्राची प्रत तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांनाही पाठविण्यात आली होती. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन गट विकास अधिकारी डॉ.संजय लखवाल यांनी दोन्ही पक्षांमध्ये मध्यस्थी करत सविस्तर चर्चा घडवून आणली. महसूल विभागामार्फत अधिकृत मोजणी करून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर दिव्यांग शेतकरी दाम्पत्याने आपले आमरण उपोषण मागे घेतले.

यावेळी घोडेगावच्या तहसीलदार सोनाली मात्रे, बिडीओ डॉ.संजय लखवाल उपोषण सोडवण्यासाठी देवखिळे यांना विनंती करून मार्ग काढला.उपोषणस्थळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी सोनई पोलीस ठाण्याचे सपोनि अनिल मोरे व पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. महसूल विभाग, पंचायत राज, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलिसांच्या समन्वयातून संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडली.

**संबंधित १३६ गटामध्ये रस्ता बांधकाम झाले नाही असे, पत्र दिले. तसेच वादग्रस्त गटामध्ये भूमी अभिलेख मार्फत मोजणी करून यात मार्ग काढता येईल.**

**गणेश सवई, कनिष्ठ अभियंता**

# श्रीरामपूरमधील वसुली व पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा 'अंधेर कारभार' चव्हाट्यावर !

## निलंबित कर्मचारी कोणासाठी करायचा वसुली : आ. रोहित पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : भगवान प्रभू श्रीरामांच्या पावन भूमीत म्हणजेच श्रीरामपूर शहरात सध्या वाढत्या गुन्हेगारीसोबतच पोलीस प्रशासनातील अंतर्गत संशयास्पद कारभाराची जोरदार चर्चा सुरू आहे. गेल्या दोन-तीन आठवड्यांत गोळीबाराच्या चार घटना घडल्या असून एका हॉटेल व्यावसायिकासह दोघांचा खून झाला आहे. या घटनांमुळे व्यापारी आणि जनतेत मोठी दहशत पसरली असून, या वाढत्या गुन्हेगारीला जबाबदार कोण, असा खडा सवाल आ. रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

या गंभीर परिस्थिती विरोधात शहरात सलग चौथ्या दिवशी कडकडीत बंद पाळण्यात आला. या संपूर्ण प्रकरणामागे पोलीस प्रशासनातील मोठा गैरकारभार आणि 'वसुलीचा वास' असल्याचा गंभीर आरोप आता समोर येत आहे. नुकताच निलंबित करण्यात आलेला एक पोलीस कर्मचारी नेमका कोणासाठी वसुलीचे (कागद गोळा करण्याचे) काम करत होता, असा थेट सवाल आमदार रोहित पवार यांनी उपस्थित करत प्रशासनाला धारेवर धरले आहे. या निलंबित



कर्मचाऱ्याच्या वसुलीच्या मागे नक्की कोणाचा हात आहे, याचा शोध घेण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. त्याहूनही धक्कादायक बाब म्हणजे, गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याला सातत्याने याच भागात नियुक्ती कशी मिळते, हा मोठा प्रश्न आहे. एकाच पोलीस अधिकाऱ्याला ८ ते १० वर्षे या अहिल्यानगर जिल्ह्यात कसे ठेवले जाते आणि त्यांना पुन्हा पुन्हा श्रीरामपूर शहराचाच ताबा कसा दिला जातो, या रहस्यमय बदल्यांवर आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

गुन्हेगारांचा पाठीराखा आणि या बदल्यांमागील सूत्रधार कितीही मोठा असला, तरी त्याचे कंबरडे मोडून श्रीरामपूर भयमुक्त करावे, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या प्रकरणात फिर्यादी व मुख्य संशयित आरोपींची अधिकृत नावे अद्याप प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलेली नाहीत.

# उपोषणाचा १९वा दिवस

## सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावली



वांगचुक यांच्या मागण्यात वावगं काहीच नाही. मंत्र्याला हाकला, परीक्षा पारदर्शक घ्या हीच तर मागणी आहे. भाजपला सध्या कोणी प्रश्न विचारु नये असा माज आहे. नीटच्या घोळाने लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याची वाट लागली.

**-राज ठाकरे**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली** : सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या बेमुदत उपोषणाचा गुरुवारी (१६ जुलै) १९वा दिवस असून, त्यांच्या ढासळत्या प्रकृतीच्या पार्श्वभूमीवर दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर आज दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

याचिकेत केंद्र सरकार आणि दिल्ली सरकारला वांगचुक यांना तातडीने रुग्णालयात दाखल करून आवश्यक उपचार व गरज भासल्यास वैद्यकीय पद्धतीने पोषण देण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. वांगचुक २० जूनपासून जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी असून, नीट परीक्षेतील कथित अनियमिततेची चौकशी, परीक्षा प्रणालीत सुधारणा आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत ते उपोषणावर आहेत.

न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठासमोर बुधवारी सरकारी पक्ष अनुपस्थित राहिल्याने सुनावणी होऊ शकली नव्हती. त्यामुळे न्यायालयाने प्रकरण आजसाठी ठेवत केंद्र व दिल्ली सरकारकडून उत्तर मागवले आहे. याचिकाकर्ते राकेश कुमार सैनी यांनी वांगचुक यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचा दावा केला आहे. आंदोलनकर्त्यांच्या माहितीनुसार, १८ दिवसांच्या उपोषणात त्यांचे सुमारे ९ किलो वजन घटून ५७.१५ किलो झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले आहे.

# १७ पोलिसांविरुद्ध तक्रारी १२ जणांची चौकशी सुरु : भवर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या यांच्या हत्येनंतर श्रीरामपूरमध्ये उसळलेल्या जनआक्रोशाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस प्रशासनावर कारवाईचा दबाव वाढला आहे. गुन्हेगारांशी संगनमत असल्याच्या आरोपावरून १७ पोलिस कर्मचाऱ्यांविरोधात तक्रारी प्राप्त झाल्या. यापैकी १२ जणांची चौकशी सुरू असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांनी दिली. आकाश दुबैय्या हत्येनंतर शहरात सलग चार दिवस बंद पाळण्यात आला. काल बुधवारी नागरिकांनी गुन्हेगारीविरोधात निषेध मोर्चा काढला. मोर्चादरम्यान काँग्रेसचे आमदार हेमंत ओगले यांनी काही पोलिस कर्मचाऱ्यांवर आरोप करत बडतर्फ करण्याची मागणी केली. दरम्यान, सराईत गुन्हेगाराशी संबंध असल्याच्या आरोपावरून पोलिस कर्मचारी शंकर चौधरी याला सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी यासंदर्भातील आदेश काढले आहेत. एका बाजूला निलंबनाची कारवाई सुरू असताना, तक्रारी प्राप्त झालेल्या १७ कर्मचाऱ्यांपैकी १२ जणांची चौकशी सुरू असल्याने श्रीरामपूर पोलिस दलावरील दबाव आणखी वाढला आहे.

# आजारपणाला कंटाळून एकाची गळफास घेऊन आत्महत्या



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी शहरातील पुरुषोत्तम कुलकर्णी (वय ५३) यांनी राहत्या घरी आजारपणाला कंटाळून गळफास घेत आत्महत्या केली असल्याची घटना काल घडली आहे. या घटनेतील पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी घराच्या एका रुममधील पत्र्याच्या अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. काल गुरुवारी सकाळी ही घटना निदर्शनास आली. आत्महत्या करण्यापूर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली यामध्ये सदरआजारपणाला कंटाळून मी आत्महत्या करत आहे. असे असल्याचे प्रत्यक्षदर्शनी नागरिकांनी सांगितले आहे. त्याच्या पश्चात वडिल, पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार असून घटनेची माहिती कळताच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तुळशीराम गीते यांनी घटनेच्या ठिकाणी येऊन माहिती घेत पंचनामा केला.

# अल्पवयीन मुलीवर लक्झरी बसचालकाकडून अत्याचार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

श्रीगोंदा : दिवाळी प्रवासादरम्यान ओळख झालेल्या एका लक्झरी बस चालकाने पैशांचे आमिष दाखवून आणि कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देऊन १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर वेळोवेळी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना श्रीगोंदा तालुक्यात उघडकीस आली आहे. या अत्याचारातून पीडित मुलगी गर्भवती राहिली आहे. याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी (वय १४ वर्षे ३ महिने) ही मूळची यवतमाळ जिल्ह्यातील असून सध्या श्रीगोंदा तालुक्यातील एका गावात राहते. माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये दिवाळीच्या सणानंतर पीडिता आपल्या आई-वडिलांसोबत यवतमाळ येथून शिरूरकडे लक्झरी बसने येत होती. प्रवासादरम्यान येण्या-जाण्याची सोय व्हावी म्हणून पीडितेच्या वडिलांनी लक्झरी बसचा चालक राहुल खडसे ( रा. पुसद, जि. यवतमाळ) याचा मोबाईल नंबर घेतला होता. यानंतर आरोपी राहुल याने पीडित मुलीला पैशांचे आमिष दाखवून घराबाहेर बोलावून घेतले. तिला लक्झरी बसमध्ये नेऊन तिच्यावर जबरदस्तीने वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवले. याबाबत कोणाला काही सांगिले तर तुझ्या आई-वडील आणि भावाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी आरोपीने दिल्याने घाबरलेल्या पीडितेने हा प्रकार कोणालाही सांगितला नव्हता. दरम्यान, मागील काही दिवसांपासून पीडितेला उलट्यांचा त्रास होऊ लागल्याने, तिच्या आईने तिला १५ जुलै २०२६ रोजी उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात नेले . तेथे डॉक्टरांनी तपासणी केली असता सदर अल्पवयीन मुलगी गर्भवती असल्याचे समोर आले. या प्रकारानंतर पीडितेने आईसह बेलवंडी पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. बेलवंडी पोलिसांनी याप्रकरणी आरोपी चालक राहुल खडसे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४(१), ६५(१), ३५१(२), (३) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) कायदा कलम ४, ६, ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला असून त्याला लवकरच अटक केली जाईल अशी माहिती बेलवंडी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांनी दिली. पोलीस उपनिरीक्षक मोहन गाजरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# नेवासा येथे बीएलो प्रतिनिधी व बुथ प्रमुखांची बैठक

## शासनाच्या सूचनांनुसार एसआयआर मोहिम यशस्वी करा : ना. विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

नेवासा : मतदार यादीची पडताळणी करणे एस आय आर मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मतदार यादी विशेष सखोल पुनर्नरीक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी नेवासाफाटा रस्त्यावरील नेवासा येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात महायुतीच्या पदाधिकारी बीएलो प्रतिनिधी व बुथ प्रमुखांची जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या प्रमुख उपस्थितीत नेवासा मतदार संघाचे आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या उत्कृष्ट नियोजनात बैठक उत्साहात पार पडली.

शासनाच्या सूचनांनुसार एस आय आर मोहिम यशस्वी करा असे आवाहन ना.राधाकृष्ण विखे यांनी यावेळी बोलतांना केले. सदर बैठकीस पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी उपस्थित राहून एस आय आर मोहिमेची उद्दिष्टे, मतदार यादी अचूक व त्रुटी मुक्त ठेवण्याचे महत्त्व तसेच बुथस्तरावर जबाबदारीने काम करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्येक पात्र मतदाराची नोंद सुनिश्चित करून शासनाच्या सूचनांनुसार मोहिम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रांतअधिकारी सुधीर पाटील यांनी बुथ प्रमुख व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध शंका आणि अडचणींचे निराकरण केले.

एस आय आर मोहिमेतील प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, पडताळणीची कार्यपद्धती आणि अंमलबजावणीबाबत सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली. नेवासा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांनी प्रशासनाशी समन्वय ठेवून मतदार यादी विशेष पुनर्नरीक्षणाचे काम वेळेत व प्रभावीपणे पूर्ण करावे असे आवाहन केले. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत कायम राहील यासाठी दक्षता घेण्याचेही त्यांनी सांगितले.

बैठकीस भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, नगरसेवक गटनेते महेश लोखंडे, नगरसेवक प्रवीण सरोदे, अंकुश म्हस्के, कृष्णा परदेशी, माळचिंचोरा माजी सरपंच प्रकाश वाघमारे, माजी सरपंच बाळासाहेब चिंधे, धरणग्रस्त समितीचे आवारे पाटील,प्रताप कोंगे, विविध पक्षांचे कार्यकर्ते, बिएलए -२ प्रतिनिधी,बुथ प्रमुख तसेच महसूल व निवडणूक विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी युवा नेते ऋषिकेश शेटे पाटील यांनी एस आय आर चे महत्व समजावून सांगितले तसेच शनिशिंगणापूर देवस्थान प्रशासकाच्या भूमिकेबद्दल आपले मत व्यक्त केले. धरणग्रस्त समितीचे अध्यक्ष आवारे पाटील यांनी मंत्रिमंडळाच्या कारभारावर आपला रोष व्यक्त करत धरणग्रस्तांच्या बाबतीत जीआर देत नाही असे स्पष्ट सांगितले ,जीआर देत नाही तर बैठक का घेता असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तसेच ना. विखे यांनी त्यांना भेट घेऊन सविस्तर चर्चा करणार असल्याचे सांगितले.

# खानापूर सोसायटीत जिल्हा बँकेचा ठराव रखडला!

## विखे-मुरकुटे गटात एकमत न झाल्याने ठराव निरंक; तालुक्यातील एकमेव सोसायटी

### शब्द न पाळल्याने...

चेअरमनपदासाठी पाठिंबा देताना जिल्हा बँकेचा ठराव आमच्याकडे आणि अशोक कारखान्याचा ठराव विखे गटाकडे राहील, असा शब्द राजेंद्र आदिक यांनी दिला होता. तो पाळला नसल्याने आम्ही विखे गटाच्या ठरावाला संमती दिली नाही.

**भाऊसाहेब मारुती आदिक**
**सदस्य (मुरकुटे गट)**

### ... तर विचार केला असता

आम्ही सहा सदस्य तटस्थ राहिलो. मात्र चेअरमन राजेंद्र आदिक यांनी आमच्याशी पाठिंब्याबाबत चर्चा केली असती, तर आम्ही त्यावर निश्चित विचार केला असता.

**निलेश सुरेश आदिक**
**माजी चेअरमन (आदिक गट)**

### शब्दच दिला नव्हता...

मुरकुटे गटाला कोणताही शब्द दिलेला नव्हता. आम्ही सुरुवातीपासून विखे गटाच्या ठरावावर ठाम होतो. आमचा ठराव फसवून नंतर वेगळे राजकीय समीकरण उभे करण्याचा प्रयत्न होत असल्याचे लक्षात आल्याने आम्ही कोणताही तडजोडीचा प्रस्ताव मांडला नाही.

**राजेंद्र आदिक**
**चेअरमन (विखे गट)**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी सभासदांचे ठराव पाठविण्याच्या अंतिम मुदतीच्या दिवशी श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीत मोठा राजकीय पेच निर्माण झाला.

सत्ताधारी विखे गट आणि युतीतील मुरकुटे गटामध्ये एकमत न झाल्याने अखेर कोणाच्याही बाजूने ठराव मंजूर होऊ शकला नाही. परिणामी तालुक्यात ठराव न पाठविणारी खानापूर ही एकमेव सोसायटी ठरली.

सोसायटीचे चेअरमन राजेंद्र आदिक यांनी विखे गटाच्या उमेदवाराच्या बाजूने ठराव करण्याचा आग्रह धरला. मात्र, चेअरमनपदाला पाठिंबा देताना जिल्हा बँकेचा ठराव मुरकुटे गटाकडे राहील, असा पूर्वी शब्द दिल्याचा दावा करत मुरकुटे गटाने त्यास विरोध केला. त्यामुळे बैठकीत एकमत होऊ शकले नाही. दरम्यान, आदिक गटातील सहा सदस्य बैठकीत तटस्थ राहिल्याने समीकरण आणखी गुंतागुंतीचे झाले.

दोन्ही गटांतील चर्चेनंतरही तोडगा न निघाल्याने अंतिम मुदत संपली आणि कोणाचाही ठराव पाठविला गेला नाही. या घडामोडीमुळे तालुक्यातील सहकार आणि राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत ८३ वर्षीय वारकऱ्याचा मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील शिंगवे तुकाई परिसरात भरधाव अज्ञात वाहनाच्या धडकेत हिंगोली ८३ वर्षीय वृद्ध वारकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या प्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गंगापूर येथील राऊतबाबा यांच्या दिंडीत असलेले वारकरी दत्तराव गंगाराम जाधव (वय ८३, रा. इडोली, ता. जि. हिंगोली) हे ११ जुलै २०२६ रोजी पहाटे सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास शिंगवे तुकाई येथील वैभव दत्त मंगल कार्यालयाजवळील एमआयडीसी चौकातून अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्ग ओलांडत असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. उपचारासाठी त्यांना नेवासा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.या प्रकरणी मृताचे पुत्र ज्ञानेश्वर दत्तात्रय जाधव ( व्यवसाय शेती, रा. इडोली, ता. जि. हिंगोली) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३२०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५(अ) (ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १३४(अ)(ब) व १८४/१७७ अन्वये अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार ए. एस. तमनर हे करीत असून, वाहनाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांची पडताळणी सुरू आहे.

**हिंगोली येथील वारकरी दत्तराव जाधव शिंगवेतुकाई अपघातात मयत झाले त्यांच्या कुटुंबाप्रती सदभावना व्यक्त करतो.त्यांना वारकरी अपघात योजने मधून ४ लाख मदत देण्यासाठी शासन पातळीवर पाठपुरावा करू.**

**आ. विठ्ठलराव लंघे, नेवासा विधानसभा**

